बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले. या निवडणुकीचे शिल्पकार म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख केला जात आहे. देवेंद्र फडणवीस राज्यातील राजकारणाचे नवीन चाणक्य ठरले असल्याचे म्हटले जात आहे. कारण आतापर्यंत भाजपला इतक यश कधी मिळाले नव्हते. परंतु २०२४ मध्ये भाजपने १३२ जागांवर विजय मिळवला आहे. या विजयाचे श्रेय देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला दिला आहे. त्यासंदर्भात द वर ट्विट करत त्यांनी मेहनत, एकजूटता, लाडक्या बहिणींचे आशीर्वाद यांना श्रेय दिले.

# दर्यादिल देवेंद्र फडणवीस

म्हणाले हा विजय जनतेचा अन् लाडक्या बहिणींचा



## पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जनतेने विश्वास ठेवला



महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले ▶ राजकारणाचे नवीन चाणक्य ठरले

### ट्विटला अनेकांनी केले लाईक
देवेंद्र फडणवीस यांच्या या ट्विटला अनेकांनी लाईक केले आहे. अनेकांनी आपल्या कॉमेंट केल्या आहेत. एका युजरने देवाभाऊ म्हणत, ही सर्व तुमची मेहनत असल्याचे म्हटले आहे. आणखी एक युजर शपथविधी समारंभाचे निमंत्रण कधी मिळणार? असा प्रश्न उपस्थित करत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावर महाराष्ट्राच्या तमाम जनतेने विश्वास दाखवल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.देवेंद्र फडणवीस यांनी ट्विटमध्ये पुढे म्हटले की, मेहनत, एकजूटता, लाडक्या बहिणींचे आशीर्वाद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावर महाराष्ट्राच्या तमाम जनतेने दाखविलेला विश्वास या विजयाचे खरे शिल्पकार आहेत. महायुतीतील सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी, मित्रमंडळी आणि माझा प्रत्येक समर्पित कार्यकर्ता ज्यांनी गेले काही दिवस जिवाचे रान करून वेळ–काळ न पाहता मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला, अशा सर्वांचा मी कायम ऋणी राहीन. आपणा सर्वांच्या पाठिंब्यामुळेच महायुतीला मिळालेल्या या विजयाने एक नवीन दिशा दिली आहे. हे यश आपल्या महाराष्ट्राला एक प्रगतीशील आणि सर्वसमावेशक भवितव्यासोबत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारतासह विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रेरणा देत राहील.

### देवेंद्र फडणवीस यांनी काय म्हटले?
महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत महायुतीला मिळालेला महाविजय फक्त भाजपा–महायुतीचा नाही, तर महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या विश्वासाचा आहे. तुम्ही दाखवलेल्या या विश्वासासाठी आणि दिलेल्या प्रेमाबद्दल महाराष्ट्राच्या जनतेपुढे मी नतमस्तक होतो, असे भावनिक वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी लिहिले आहे.

## ...मी घरी बसणार नाही
### चर्चा: पराभवानंतर शरद पवारांनी सांगितली रणनीती!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
पक्षात फूट पडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी महाराष्ट्र दौऱ्याला निघालेल्या शरद पवारांची भूमिका वि धानसभेच्या निकालानंतर काय असेल असा प्रश्न अवघ्या राज्याला पडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने ८६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे केले होते. तसंच, बारामती विधानसभा मतदारसंघातून त्यांनी अजित पवारांविरोधात त्यांचाच सख्खा पुतण्या युगेंद्र पवारांना उभं केलं. प्रत्येक उमेदवारासाठी शरद पवारांनी सभा घेतल्या. परंतु, कालच्या निकालानंतर राष्ट्रवादीने केवळ दहाच जागा जिंकल्याचं स्पष्ट झालं. त्यामुळे शरद पवारांची पुढची रणनीती काय यावर त्यांनी आज भाष्य केलं. कराड येथे त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन माध्यमांशी संवाद साधला. हा पराभव स्वीकारला असून जनतेचा कौल आम्ही मान्य केला आहे, असं शरद पवार म्हणाले.

लोकसभेप्रमाणे विधानसभेतही बारामती विधानसभा मतदारसंघ महाराष्ट्राच्या राजकारणात केंद्रस्थानी होता. या जागेवरून अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार अशी काका–पुतण्यांची लढत होती. गेल्या २० वर्षांपासून अजित पवार येथून आमदार आहेत. तर, युगेंद्र पवार या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पहिल्यांदाच राजकारणात सहभागी झाले. परंतु, त्यांच्यामागे शरद पवारांचं मोठं समर्थन होतं. त्यामुळे बारामतीची पान २ वर...



### अजित पवार अन् युगेंद्रची तुलना होऊ शकत नाही
शरद पवार म्हणाले की, बारामतीमधून कोणालातरी उभं करणं गरजेचं होतं. कोणाला उभं केलं नसतं तर महाराष्ट्रात काय संदेश गेला असता? आम्हाला माहीत आहे की अजित पवारांची युगेंद्रशी तुलना होऊ शकत नाही. अजित पवारांनी येथे बरीच वर्षे काम केलं आहे. सत्तेतील साथ हे एका बाजूला आणि नवखा तरूण उमेदवार एका बाजूला, त्यामुळे याची तुलना होऊ शकत नाही.

## विभाजनवादी राजकारणाचा पराभव
### जल्लोष:पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काँग्रेसवर टीका



### उध्दव ठाकरेंना मतदारांनी नाकारले नड्डा
महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने मिळवलेले यश ऐतिहासिक असल्याचे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा म्हणाले. २०१९ मध्येही भाजप–शिवसेना युतीने विजय मिळवला होता. पण, उद्धव ठाकरेंनी आम्हाला धोका दिला. या निवडणुकीत राज्यातील मतदारांनी ठाकरेंनाच नाकारले. मोदी आणि महायुतीच्या मागे उभे असल्याचा स्पष्ट कौल लोकांनी दिला आहे. महाराष्ट्रातील विजयाने देशातील जनतेचा मूड स्पष्ट केला आहे, असेही नड्डा म्हणाले.

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
महाराष्ट्रातील महायुतीच्या विजयाने देशाला 'एक है तो सेफ है'चा महामंत्र दिला आहे. मतदारांनी काँग्रेसच्या विभाजनवादी राजकारणाचा पराभव केला असून एकतेचा संदेश दिला आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी महायुतीच्या प्रचंड यशाचे कौतुक केले. राज्यातील विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने काँग्रेसप्रणित महाविकास आघाडीला धूळ चारली. राज्यात सलग तिसऱ्यांदा भाजप विजय झाली. भाजपच्या मुख्यालयातील झालेल्या विजयोत्सवात कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या भाषणामध्ये मोदींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना विजयाचे श्रेय दिले.भाजप वा भाजपआघाडीला सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवून देणारे महाराष्ट्र हे सहावे राज्य ठरले आहे. महाराष्ट्रातील जनतेने जात, धर्म, भाषा, प्रांत या भेदाभेदांच्या पलिकडे जाऊन भाजप व त्यांच्या मित्र पक्षांना पान २ वर...



## गुगल मॅपने घात केला
दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
उत्तर प्रदेशच्या बरेली आणि बदाऊन सीमेवर भीषण अपघात झाला आहे. येथे रामगंगा नदीवर बदायूंतील फरीदपूर–दातागंजला जोडणाऱ्या अपूर्ण बांधकामाधीन पुलावरून टॅक्सी परमिट कार खाली पडली, परिणामी तीन जणांचा मृत्यू झाला.गाडीतील लोक गुगल मॅपच्या मदतीने प्रवास करत होते. त्याला पुलाबद्दल काहीच माहिती नव्हती. कारचा वेग जास्त असावा, त्यामुळे चालकाला गाडी थांबवता आली नाही आणि पूल संपताच ती सुमारे २५ फूट खाली रामगंगेत पडली, त्यामुळे कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला.

## मुंबई इंडियन्स एकाच खरेदीसह अधिक मजबूत
### ट्रेंट बोल्टची घरवापसी: बुमराह–बोल्टची जोडी ठरणार डोकेदुखी

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
मुंबई इंडियन्स संघाने आयपीएल २०२५ च्या लिलावात पहिलाच खेळाडू खरेदी करत संघ अधिक मजबूत केला आहे. मुंबई इंडियन्सने उत्कृष्ट वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टवर बोली लावत त्याला १२.०५ कोटींना संघात सामील केलं आहे. मुंबई इंडियन्सने याआधीच अनुभवी फलंदाजांना संघात कायम ठेवलं आहे. आता बुमराहच्या जोडीला बोल्टला मुंबईने संघात सामील केलं आहे. बोल्ट गेली तीन वर्षे राजस्थान रॉयल्सचा भाग होता. आता बोल्टची पुन्हा घरवापसी



झाली आहे.आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावात मुंबई इंडियन्सकडे संघ तयार करण्यासाठी ४५ कोटी रुपये आहेत. त्यामुळे संघ बांधणीसाठी मिळालेल्या १२० कोटींपैकी मुंबई इंडियन्सने ७५ कोटी रुपये हार्दिक पान २ वर...

## अदानींना अमेरिका 'एसईसी'चे समन्स
### कारवाई:लाचखोरीप्रकरणी खुलासा करण्याचे निर्देश

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
अमेरिकेच्या सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज कमिशनने (एसईसी) उद्योगपती गौतम अदानी आणि सागर अदानी यांना लाचखोरीप्रकरणी समन्स बजावले आहे. भारतामधील काही राज्यांमध्ये सौर ऊर्जा कंत्राटे मिळवण्यासाठी २६५ दशलक्ष डॉलर (२,२०० कोटी रुपये) लाचेपोटी दिल्याचा अदानी यांच्यावर आरोप आहे.



गौतम अदानी यांच्या अहमदाबादमधील शांतीवन फार्म निवासस्थानी आणि सागर अदानी यांच्या अहमदाबादमधीलच बोडकदेव निवासस्थानी ही समन्स पाठवण्यात आली आहेत. ही नोटीस २१ नोव्हेंबरला बजावण्यात आली असून 'एसईसी'ने दोघांनाही २१ दिवसांच्या आत उत्तर देण्यास सांगितले आहे. अदानी यांच्यावर सौर ऊर्जा कंत्राटासाठी भारतातील काही राज्यांच्या अधिकाऱ्यांना लाच दिल्याचा, त्यासाठी अमेरिकी गुंतवणूकदारांचे पैसे वापरण्याचा आणि अमेरिकी गुंतवणूकदारांच्या पैशांच्या व्यवहाराची माहिती तेथील यंत्रणेपासून लपवून ठेवल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.न्यूयॉर्क ईस्टर्न डिस्ट्रिक्ट कोर्टा'ने अमेरिकेच्या दिवाणी कार्यवाहीच्या फेडरल नियमांच्या नियम १२ अंतर्गत हे समन्स बजावले आहे. ''तुम्हाला हे समन्स बजावल्यापासून २१ दिवसांच्या आत तुम्ही फिर्यादीला उत्तर पाठवले पाहिजे,'' असे त्यात नमूद करण्यात आले आहे. तसेच याला उत्तर दिले नाही तर कसूर केल्याचा निकाला दिला जाईल असा इशाराही देण्यात आला आहे. सागर अदानी हे 'अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड'चे संचालक आहेत.न्यूयॉर्क ईस्टर्न डिस्ट्रिक्ट कोर्टा'ने अमेरिकेच्या दिवाणी कार्यवाहीच्या फेडरल नियमांच्या नियम १२ अंतर्गत हे समन्स बजावले आहे. ''तुम्हाला हे समन्स बजावल्यापासून २१ दिवसांच्या आत तुम्ही फिर्यादीला उत्तर पाठवले पाहिजे,'' असे त्यात नमूद पान २ वर...

चर्चेतले | विधानसभेत कितीजणींना मिळाली संधी?

## लाडक्या बहिणीं'च्या राज्यात...

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
निवडणुकीचे निकाल जाहीर झाले, महायुतीकडून निवडणूक लढणारे हौसे, नवसे, गौवसे, मंत्र्यांच्या मागे धावणारे त्यांचे स्वीय सहायक, सर्वच निवडून आले. अन् हा सर्व चमत्कार 'लाडकी बहीण ' योजनेमुळे झाला, असे दावेही केले जाऊ लागले. एकीकडे लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळालेला असताना दुसरीकडे महिला उमेदवारांनाच नाकारल्याचं चित्र आहे. यंदा विधानसभा निवडणुकीत एकूण ४ हजार १३६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यापैकी २५० च्या जवळपास महिला उमेदवार होत्या. म्हणजेच एकूण उमेदवाराच्या सहा ते सात टक्केच महिलांना संधी मिळाली. आता निवडून आलेल्या महिला उमेदवारांची संख्याही ७ टक्क्यांच्या



घरातच आहे.२३ नोव्हेंबरला झालेल्या मतमोजणीत २५० पैकी फक्त २१ महिला उमेदवार विजयी ठरल्या. यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या सर्वाधिक महिला आहेत. भाजपाच्या १४ महिला उमेदवार जिंकून आल्या असून यामध्ये १० उमेदवारांचा पुन्हा विजय झाला आहे. यामध्ये चिखलीतील श्वेता महाले, जिंतूरमधून मेघना बोर्डिकर, नाशिक मध्यमधून देवयानी फरांदे, नाशिक पश्चिममधून सीमा हिरे, बेलापूरमधून मंदा म्हात्रे, दहीसरमधून मनीषा चौधरी, गोरेगाव येथून विद्या ठाकूर, पर्वतीमधून माधुरी मिसाळ, शेवगावमधून मोनिका राजळे आणि कैजमधून नमिता मुदंडा यांचा समावेश आहे. भोकरमधील श्रीजया चव्हाण, कल्याण पूर्वमधून सुलभा गायकवाड, वसईममधून स्नेहा पंडित, फुलांब्रीमधून अनुराधा चव्हाण या नव्या महिला उमेदवारांनीही यंदा दणदणीत विजय मिळवला.साक्रीतून मंजुळा गावित, कन्नडमधून संजना जाधव या शिवसेना (एकनाथ शिंदे) यांच्या पक्षातून निवडून आल्या. तर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार) सुलभा खोडके (अमरावती), सरोज अहिरे (देवळाली) आणि अनुशक्तीनगरमधून सना मलिक तर, श्रीवर्धमधून आदिती तटकरे यांचा विजय झालाय. तर, राष्ट्रवादी पान २ वर...

## बालेकिल्ला ढासळून गेला
### घरघर:सोलापूर जिल्ह्यातून काँग्रेस पक्ष हद्दपार

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
एकेकाळी संपूर्ण सोलापूर जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जायचा. परंतु गेल्या २५–३० वर्षांत हा बालेकिल्ला ढासळत गेला आणि मावळत्या विधानसभेत सोलापुरात काँग्रेसकडे केवळ एकच जागा होती. आता ही एकमेव जागा देखील गमावल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातून काँग्रेस पक्ष हद्दपार झाला आहे. सुमारे चार दशके सत्ताकारणात राहिलेले ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या उत्तराधिकारी असलेल्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या 'उद्योगा'मुळे पक्षावर हे गंडांतर आल्याचे आता राजकीय वर्तुळात उघडपणे बोलले जात आहे.यापूर्वी २०१४ आणि २०१९ अशा सलग दोनवेळा



सोलापूर लोकसभा निवडणुकीत सुशीलकुमार शिंदे यांना पराभवाचे धक्के बसले होते. योगायोगाने त्यांच्या कन्या प्रणिती शिंदे यांनी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा प्रतिनिधित्व केल्यानंतर गेल्या लोकसभेत त्या निवडूनही आल्या. परंतु लोकसभा निवडणुकीत त्यांना स्वतःच्या शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून अवघ्या ७९६ इतके तुटपुंजे मताधिक्य मिळाले होते. भाजपने हे मताधिक्य रोखून धरले होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीची तयारी करताना शिंदे कुटुंबीयांनी पान २ वर...

# संघ'शक्तीचा विजय!

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी युती– आणि त्यातही विशेषत: भाजप– यांचे या अभूतपूर्व विजयाबद्दल अभिनंदन. हा विजय सर्वार्थाने 'संघ'शक्तीचा ठरतो. सत्ताधारी युती ही एक संघ म्हणून लढली, त्यांना भाजपचे विचारकुल असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची साथ मिळाली आणि त्याच वेळी मतदानाच्या दिवसापर्यंत विरोधी महाविकास आघाडी आपली एकसंधता मतदारांसमोर सादर करू शकली नाही. सत्ताधाऱ्यांनी शेवटपर्यंत संघवृत्ती दाखवली याबद्दल ते निश्चितच अभिनंदनास पात्र ठरतात. तथापि केवळ संघवृत्ती प्रदर्शनामुळे सत्ताधारी जिंकले असे म्हणणे हे सुलभीकरण झाले. या संघवृत्तीस 'धर्म' आणि 'अर्थ' यांची सुयोग्य साथ मिळाल्यामुळे सत्ताधाऱ्यांचा हा विजय अधिक सुकर झाला हे अमान्य करता येणार नाही. या विजयाचे विश्लेषण आणि अन्वयार्थ बराच काळ लावले जातील. विशेषत: २०१४ सालाप्रमाणे नरेंद्र मोदी लाट नसतानाही भाजपने त्या वेळपेक्षाही अधिक मोठा विजय नोंदवला ही बाब विशेष स्पृहणीय.पहिला मुद्दा अर्थ. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कितीही कंठरव केला तरी 'रेवडी' हे भारतीय निवडणुकीचे एक महत्त्वाचे परिमाण कायमच राहिलेले आहे. लोकसभा निवडणुकीत दणका बसल्यानंतर हे प्रारूप 'लाडकी बहीण' योजनेच्या रूपाने महाराष्ट्रात अवतरले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना घरबसल्या दरमहा १५०० रुपये यातून दिले जातात. याला मिळणारा प्रतिसाद पाहिल्यावर शिंदे यांनी ही रक्कम दरमहा २१०० रु. करण्याची घोषणा केली. विरोधकांनी यास प्रथम विरोध केला आणि नंतर घूमजाव करत स्वत: तीन हजार रुपयांचे आश्वासन दिले. अस्थिर राजकीय वातावरणात हातात असलेले चार आणे भविष्यातील रुपयाच्या आश्वासनापेक्षा मोलाचे असतात हे राजकीय शहाणपण अंगी असल्याने महिलांनी शिंदे यांस भरघोस पाठिंबा दिला. मतदानदिनी सणासमारंभीय वस्त्रप्रावरणात रांगा लावणाऱ्या महिला ही सरकारला मिळणाऱ्या पाठिंब्याची पहिली चुणूक होती. ती शेवटपर्यंत टिकून राहिली. विद्यामान सत्ताधाऱ्यांस मिळालेल्या भरघोस पाठिंब्याचा हा एक 'अर्थ'.दुसरा मुद्दा धर्म हा. तो भाजपने दुहेरी पातळीवर चालवला. दृश्य आणि अदृश्य असा. दृश्य पातळीवर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा 'बटेंगे तो कटेंगे' हा नारा होता. महाराष्ट्राच्या पुरोगामी मातीत तो चालणार नाही, असे मानले जात होते. पण ही आशा अगदीच भाबडी ठरली. शहरांच्या पातळीवर धार्मिक मुद्द्यावर ध्रुवीकरण झाले असे दिसते. त्याच वेळी अदृश्य पातळीवर भाजपने 'ओबीसीं'ना आपल्याकडे वळवण्यासाठी धूर्त खेळी केली. ताज्या लोकसभा निवडणुकीत मराठा मतदारांनी फटकारल्यानंतर भाजपने लहान–लहान मराठेतर जाती–प्रजातींना चुचकारणे सुरू केले. विशिष्ट समाजांसाठी महामंडळे, महिलांसाठी वसतिगृहे आदी वरकरणी निरुपद्रवी भासणाऱ्या उपाययोजनांच्या जोडीने भाजपने पडद्यामागे लहान–लहान वस्त्या, पाडे, खेडी आदी ठिकाणी राज्यभर 'ओबीसी' मेळावे घेतले. गेल्या चार महिन्यांत, म्हणजे लोकसभा निवडणुकींनंतर विधानसभा निवडणुका जाहीर होईपर्यंत अशा मेळाव्यांची संख्या ३३० झाली होती. यावरून भाजपने घेतलेल्या कष्टांचा अंदाज येईल. या सगळ्यांस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मिळालेली सक्रिय साथ कमालीची निर्णायक ठरली. लोकसभा निवडणुकांत संघ तटस्थ होता. त्याची किंमत भाजपला मोजावी लागली. या झटक्याने भाजपस भानावर आणले आणि संघाचे मन वळवण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न झाले. त्यानंतर गेले तीन महिने संघ स्वयंसेवकांनी रात्रीचा दिवस करून भाजपसाठी विजयासाठी आवश्यक ती सामाजिक पेरणी केली. संघाचे सक्रिय असणे आणि नसणे हा विधानसभा निवडणुकीतील यश आणि लोकसभेतील मर्यादित यश यांतील फरक. तो या निकालांतून ठसठशीतपणे समोर येतो.तितक्याच ठसठशीतपणे समोर येते ते विरोधकांचे अपयश. आपण एक आहोत हे ते विरोधक शेवटपर्यंत मतदारांस दाखवू शकले नाहीत. यात बिनडोक हास्यास्पद होता तो शिवसेनेचे संजय राऊत आणि काँग्रेसचे नाना पटोले यांच्यातील कलगीतुरा. निवडणुका जाहीरही झाल्या नव्हत्या तेव्हा हे विद्वान मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण यावर जाहीर वाद घालत बसले. त्यांच्या नेत्यांस त्यांना आवरता आले नाही. हे म्हणजे विवाह ठरलाही नाही तोवर भावी अपत्यास कोणत्या शाळेत घालावे यावरून भांडणाऱ्या प्रियकर–प्रेयसीप्रमाणे झाले. उभय पक्षांतील मतभेद मतदानाच्या दिवसापर्यंत दिसून येत होते. उद्धव ठाकरे यांची सोलापूर येथे झालेली शेवटची सभा आणि मतदानाच्या दिवशी त्यांच्या कार्यकर्त्यांनी केलेले सुशीलकुमार शिंदे कन्या प्रणिती हिच्या छायाचित्रास 'जोडे मारो' आंदोलन. इतक्या उघडपणे आपले मतभेद उघड्यावर आणणाऱ्या राजकीय पक्षांवर मतदारांनी कसा विश्वास ठेवावा? आणि दुसरे असे की एकनाथ शिंदे यांच्या मागे 'गद्दार गद्दार' म्हणून लागणे आणि सदासर्वकाळ अदानी आणि धारावी मुद्द्यावर आदळआपट करणे मतदारांस रुचले नाही. या दोन मुद्द्यांचा काहीही प्रभाव निवडणुकीत पडला नाही. त्याच वेळी काँग्रेसचे राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात फक्त चार सभा घेतल्या आणि प्रियांकाही तोंडदेखले दर्शन देऊन गेल्या. त्या पक्षाने महाराष्ट्रास अधिक महत्त्व देणे गरजेचे होते. ते झाले नाही.

# जनतेने भावनिक राजकारण लाथाडले!




महाविकास आघाडीतील दोन पक्षांची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे आणि त्यात काँग्रेस नेतृत्व राज्यात नेतृत्वहीन असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. राज्याच काँग्रेस नेतृत्व खमकेपणाने पक्षाची भूमिका मांडणारे नव्हते.तर इतर दोन पक्ष आपल्याच दु:खावरच्या खपल्या मोजत बसले.त्यामुळे महाविकास आघाडी बॅकफूटवर गेली, ती प्रचारात दिसून आली होती.त्यामुळे महाविकास आघाडीची मदार नेमकी कुणावर होती किंवा कोणत्या मुद्यावर हेच जनतेला कळाले नाही.महाविकास आघाडीतील प्रत्येक पक्ष संविधान बदलाच्या मुद्यांच्या पुढं जाऊ शकला नाही.तर लाडकी बहिण योजना मुळात महायुती सरकारची तिच्या मानधनात वाढ करण्याचे आश्वासनही जनतेने फोल ठरवले.कारण , ही योजना महाविकास आघाडी सरकारच्या अडीच वर्षांत लागू व्हायला हवी होती.त्यामुळे कोणतेच आश्वासन खरे वाटले नसल्याने जनतेने पुन्हा महायुतीला निवडले. महायुती सरकारची थेट योजना म्हणजे नमो शेतकरी सन्मान योजना आणि मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना तळागाळापर्यंत पोहोचली गेली.तर याच योजनांच्या प्रबळ अंमलबजावणीमुळे जनतेने विकासावर शिक्कामोर्तब केले. राज्यातील लाडक्या बहिणींनी लाडक्या भावांना पुन्हा निवडले.महायुतीच्या अडीच आणि २०१४ साली मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या कायावरचा हा विश्वास म्हणावा लागेल.खरे तर २०१४ पासून ते सलग महायुतीला निवडले आणि आताही महायुतीला कौल दिला.त्यानंतर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. तत्कालीन देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळातील जलयुक्त शिवार योजना, मागेल त्याला शेततळे, घरकुल योजना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना,स्वाधार योजना , मुख्यमंत्री ग्राम सडक योजना आदी योजनांची अंमलबजावणी शेवटच्या माणसापर्यंत झाल्याचे कोणीही मान्य करेल. प्रत्येक योजना तळागाळापर्यंत पोहोचली आहे. आदी विकासकामे केल्याने भाजपला सर्वाधिक पसंती २०१४– २०१९–२०२४ मिळाली.ही उपमुख्यमंत्री फडणवीस यांची दूरदृष्टी लक्षात येते.तर या निवडणुकीत कोणताच फॅक्टर चालला नाही.हे या निकालातून स्पष्ट होते.मराठा आरक्षणाचा प्रखर विरोध उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा असल्याचे वारंवार माध्यमातून दाखवलण्याचा प्रयत्न झाला.तसा मराठा आंदोलकही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराठा आरक्षण विरोधी मानत.पण,याचा कुठलाच परिणाम या निकालात दिसत नाही हे विशेष. कारण, तत्कालीन मुख्यमंत्री आणि आता उपमुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजासाठी अनेक योजना आणल्या या योजनांचा फायदा अनेक मराठा समाजातील तरुणांना, शेतकऱ्यांना झाला.सारथी संस्थेतून मराठा समाजातील अनेक तरूण नोकरीला लागले.ही वस्तुस्थिती कोणीही नाकारू शकत नाही.आजच्या निकालाचे दुसरे वास्तव म्हणजे सोबतीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचे हे यश आहे. राजकारण करण्यासाठी विकासाचे भाषा आवश्यक

पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२



असल्याचे या निकालाने स्पष्ट केले आहे. भावनेच्या लाटेवर आजवर चालणारा महाराष्ट्र विकासाच्या वाटेवर चालणारा आहे हे या निर्विवाद निकालाने स्पष्ट केले आहे. भाजप –शिवसेना(शिंदे )आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष(अप) एकत्र आल्यामुळे विरोधक विरोधाला सुद्धा उरला नाही.पक्ष भावनेच्या अस्मितेच्या लाटेवर नाही तर विकासाच्या, विचारांच्या लाटेवर चालतो. हे शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अप) यांना दिलेल्या मतदानातून सिध्द झाले. राज्यामध्ये झालेली भाजपची सरशी ही विकासाची ब्ल्यू प्रिंट तर त्यांच्या सोबतीला असलेले सामान्यातून सामान्य माणूस मुख्यमंत्री झाले त्यांची शिवसेना आणि शिव– फुले –शाहू –आंबेडकर यांच्या विचारांवर बाधलेला राष्ट्रवादी काँग्रेस (अप)या तीन पक्षांची सरशी विरोधकांना तोंडांत बोटं घालून पाहण्याची वेळ यावी असा हा ऐतिहासिक विजय महायुतीला मिळाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी असल्याचे या निकालाने सांगितले आहे. हेच मुळ पक्ष स्थापना करताना ज्या विचारांवर स्थापन झाले त्या विचारांशी बांधिलकी असल्याचे आजच्या निकालाने स्पष्ट केले. एकूण ५३ ठिकाणी शिवसेना (शिंदे) आणि शिवसेना उबाठा यांच्यात समोरासमोर लढत झाली यात शिवसेना (शिंदे)३६ तर शिवसेना (उबाठा)१५ जागी विजयी झाल्यामुळे जनता उध्दव ठाकरे यांच्या भावनिक आवाहनाला साथ दिली नाही.तर हीच परिस्थिती राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) यांची झाली. समाजातील सर्वच घटकांना आता विकास हवाय असा हा निकाल सांगत असावा. कारण समाजातील सर्वच घटकांनी महायुतीला तारले.विशेष म्हणजे लाडक्या बहिणींनी महायुतीला तारले आहे. काही जिल्ह्यांत तर विधानसभेच्या सर्वच्या सर्व जागा महायुतीने जिंकले आहेत. यामध्ये साताऱ्यात आठ विधानसभेच्या जागा आठही महायुतीकडे आहेत. सिंधुदुर्ग तीन विधानसभा तीनही महायुतीकडे धुळे, जळगाव, रायगड आदी.जिल्ह्यात हीच परिस्थिती दिसते. महायुतीला लाडक्या बहिणींनी २३२ तर महाविकास आघाडीला ५१ आणि इतर ५ असा एकतर्फी कौल मतदारांनी दिला.याच श्रेय २०१४ पासून असलेल्या तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ते आजचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजीत पवार यांच म्हणता येईल.२०१४ साली मुख्यमंत्री आणि नंतर सरकारच्या बाहेर राहण्याचा निर्णय ते उपमुख्यमंत्री आणि महायुतीचा २०२४ चा विजय पाहता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चाणक्य असल्याचे त्यांच्या रणनितीतून लक्षात येते.

## पान एक वरून

**...मी घरी बसणार नाही**

जनता अजित पवारांना साथ देईल की शरद पवारांना समर्थन देईल, यावर पवार कुटुंबांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. दरम्यान, २३ नोव्हेंबर रोजी विधानसभेचा निकाल जाहीर झाला आणि अजित पवार जवळपास एक लाख मताधिक्क्याने जिंकले. यावर शरद पवारांना विचारलं असता ते म्हणाले की अजित पवार आणि युगेंद्र पवारांची तुलना होऊच शकत नाही.शरद पवारांनी आतापर्यंत आयुष्यात अनेक राजकीय वादळे झेलली आहेत. त्यांच्या राजकीय कारकिर्दीत अनेक चढउतार आले. पण प्रत्येकवेळी त्यांनी त्यावर मात केली आहे. या अनेक अनुभवांविषयी शरद पवार त्यांच्या अनेकविध भाषणांतही सांगत असतात. त्यामुळे आता वयाच्या ८४ व्या वर्षी आलेल्या अपयशामुळे शरद पवार पुढे काय भूमिका घेतात याकडे सगळ्या राज्याचं लक्ष आहे. यावर ते म्हणाले, निकाल काल लागला. आज मी कराडमध्ये आहे. हा निकाल लागल्यानंतर एखादा घरी बसला असता. पण मी काही घरी बसणार नाही. आमच्या तरुण पिढीला हा निकाल लागेल असं वाटलं नव्हतं. त्यांचा आत्मविश्वास वाढला पाहिजे. त्यांना पुन्हा उभं करणं, त्यांचा आत्मविश्वास वाढवणं, नव्या जोमाने कर्तृत्वान पिढी उभी करणं हा माझा कार्यक्रम राहील', असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

**विभाजनवादी राजकारणाचा**

मते दिली. दलित, आदिवासी, ओबीसींसह समाजातील प्रत्येक घटकांनी महायुतीला पाठिंबा दिला. त्यांच्या या भूमिकेमुळेच काँग्रेस व महाविकास आघाडीचा समाजामध्ये फूट पाडण्याचे कुटील कारस्थान अपयशी ठरले, असे मोदी म्हणाले.महाराष्ट्रामध्ये सलग तिसऱ्यांदा भाजप सर्वाधिक जागा मिळणारा पक्ष ठरला. यावेळी तर सर्व विक्रम मोडले गेले. ५० वर्षांनंतर पहिल्यादा निवडणूकपूर्व आघाडीला इतके भरघोस यश मिळाले आहे. गेल्यावेळीही युतीला मतदारांनी कौल दिला होता. पण, काही जणांच्या वेगळ्या इराद्यामुळे काही काळासाठी भाजपला सत्ता गमवावी लागली होती, असे म्हणत मोदींनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरे यांच्यावर टीकेची झोड उठवली.महायुतीचा महाराष्ट्रातील विजय हा विकास, सुशासन आणि समाजिक न्यायाचा विजय ठरला आहे. मतदारांनी काँग्रेसच्या घराणेशाहीला नाकारले आहे. काँग्रेसला देशाचा मूड काय आहे हेच समजलेले नाही. काँग्रेसला वास्तव कळलेले नाही. देश अस्थिर झालेला लोकांना मान्य नाही. देशाच्या हिताला लोकांनी प्राधान्य दिले आहे. संविधान, आरक्षणाबाबत काँग्रेसने लोकांची दिशाभूल केली आहे. या देशात एकच संविधान असेल. त्या आधारावर कोणताही पक्ष समाजामध्ये फूट पाडू शकत नाही, अशी ग्वाही मोदींनी दिली.

**अदानींना अमेरिका 'एसईसी'चे**

करण्यात आले आहे. तसेच याला उत्तर दिले नाही तर कसूर केल्याचा निकाला दिला जाईल असा इशाराही देण्यात आला आहे. सागर अदानी हे 'अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड'चे संचालक आहेत.अमेरिकेच्या न्याय मंत्रालयाने गौतम अदानी, सागर अदानी यांच्यासह अन्य सहा जणांवर लाचखोरीचा आरोप ठेवला आहे. त्याच्या जोडीला 'एसईसी'ने या अदानी काका–पुतण्यावर आणि अज्योर पॉवर ग्लोबलचे कार्यकारी अधिकारी सिरील कॅबेन्स यांच्यावर आरोप ठेवले आहे. अदानी समूहाने अमेरिकी फर्मसह अन्य गुंतवणूकदारांकडून कर्ज आणि रोख्यांच्या स्वरूपात दोन अब्ज डॉलर उभे केले. त्यासाठी त्यांनी या फर्मच्या लाचखोरीविरोधी धोरणांशी संबंधित खोटे व दिशाभूल करणारे विवरणपत्रे वापरली असाही त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे. मात्र अदानी समूहाने हे आरोप फेटाळले आहेत.

**मुंबई इंडियन्स एकाच खरेदीसह**

पंड्या, जसप्रीत बुमराह, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांना रिटेन करण्यात खर्च केला. मुंबईला एकूण २० खेळाडू खरेदी करायचे आहेत, ज्यामध्ये ८ विदेशी खेळाडूंसाठी स्लॉट आहेत.ट्रेंट बोल्ट हा सुरूवातीच्या षटकांमध्ये भेदक गोलंदाजी करत विकेट्स घेण्यासाठी ओळखला जातो. बुमराहची गोलंदाजी आपल्या सर्वांनाच माहित आहे. त्यामुळे बोल्ट आणि बुमराहची जोडी प्रतिस्पर्धी संघांसाठी मोठी डोकेदुखी ठरणार आहे. २० षटकांमधील ८ षटकं बुमराह टाकणार म्हणजे समोरच्या संघातील फलंदाज किती काळ मैदानावर टिकणार हा मोठा प्रश्न असणार आहे. बोल्ट संघात पुन्हा सामील झाल्याने मुंबई इंडियन्सचा संघ अधिक मजबूत झाला आहे.

**बालेकिल्ला ढासळून**

पक्षाची ताकद न वाढविता उलट गुंता निर्माण केला. विशेषतः खासदार प्रणिती शिंदे यांची अपरिपक्वता दिसून आली.एकीकडे भाजपचा धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयोग आणि दुसरीकडे एमआयएम पक्षाची घुसखोरी, यातच स्वपक्षातील नाराज मंडळींनी सोडलेली साथ काँग्रेससाठी धोकादायक ठरली. हा धोका दूर करण्याच्या दृष्टीने शिंदे कुटुंबीयांनी गांभीर्याने पावले उचलली नाहीत. भाजपकडून देवेंद्र कोठे हे मोठ्या मतफरकाने निवडून येणे ही बाब सुद्धा शिंदे कुटुंबीयांच्या दृष्टीने जखमेवर मीठ चोळणारी असल्याचे बोलले जाते. दुसरीकडे सोलापूर दक्षिण मतदारसंघातही महाविकास आघाडीमध्ये लाथाळ्या वाढल्या. त्याची परिणती काँग्रेसचे अस्तित्वच हिरावून घेणारी ठरल्याचे आता उघडपणे बोलले जात आहे. सोलापूर लोकसभा क्षेत्रात पूर्वी सहापैकी भाजपचे चार आमदार होते. आता ते पाच झाले आहेत. एकट्या मोहोळमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने थोडी इभ्रत राखली आहे.

**लाडक्या बहिणीं'च्या**...काँग्रेस (शरद पवार) पक्षाने १० महिला उमेदवारांना निवडणूक लढवण्याची संधी दिली होती. परंतु, त्यातील एकही महिला उमेदवाराचा विजय झाला नाही.२०१९ मध्ये भाजपाने १२ महिला उमेदवारांना संधी दिली होती. तर, शिवसेनेने ९, काँग्रेसने १५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ९ महिला उमेदवारांना संधी दिली होती. म्हणजेच मुख्य प्रवाहातील पक्षांनी ४५ महिला उमेदवार उभे केले होते. त्यापैकी फक्त २४ महिला उमेदवार जिंकल्या. २८८ सदस्यांच्या विधानसभेत फक्त २४ महिला आमदार म्हणजेच फक्त ८ टक्के महिला आमदार होत्या. तर यावेळी २१ महिला उमेदवार जिंकल्याने ही टक्केवारी ७ टक्क्यांवर आली आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये राज्यात ३३ टक्के महिला आरक्षणाचा ठराव पास करण्यात आला. पुढची जनगणना झाल्यानंतर ३३ टक्के आरक्षणाचे बिल अंमलात येणार आहे. तेव्हा सभागृहात २८८ पैकी ९६ महिला आमदार असणं अपेक्षित असेल. त्यामुळे सभागृहात महिला प्रतिनिधींचा आवाज वाढवण्याकरता आता २०२९ च्या निवडणुकीची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## पान सहा वरून

**केजमध्ये मनरेगाच्या शेकडो**

अनुदान दिले जाते त्यांतील एक लाख रुपये भोगस विहीरीची रक्कम काढण्यासाठी बिडीओ, पासून ते रोजगार सेवका पर्यंत वाटले जाते मग अशा भोगस विहीरी फक्त पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांना लाच घेण्यासाठी मंजूर केल्या आहेत का असा प्रश्न नागरिकांना पडला तरी केज तालुक्यातील मनरेगा अंतर्गत मंजूर झालेल्या विहीरीची चौकशी संमधीत प्रशासन म्हणजे सीओ साहेब यांनी तात्काळ करावी व अशा भोगस विहीरी मंजूर करून देणाऱ्या अधिकाऱ्यांन वर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**इतर कारखान्यापेक्षा...**कारखान्याने इतर कारखान्यापेक्षा जास्त ऊसाला भाव दिला आहे तीच परंपरा या गाळप हंगामात कायम राहील असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नारायण अण्णा डक, भाई गंगाभीषण थावरे, भाई नारायण गोले, नारायण होके,विनायक मुळी, श्रीहरी काळे, महादेव जमाले, अरुनराव इंगळे, प्रशांत मोरे, प्रकाश जेधे, विश्वंभर थावरे, कचरू खळगे, शकीलभाई खुरेशी, कॉम्रेड दत्ता डाके,प्रभाकर नरवडे, युवराज लगड, संतोष यादव, रामराजे रांजवन यांचे सह कारखान्याचे संचालक, ऊस उत्पादक शेतकरी,सभासद , कारखान्याचे कर्मचारी,ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूक ठेकेदार,पत्रकार , कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**रानमळ्यात उभारला वनराई**

आजूबाजूच्या विहीर, बोअरवेल यांच्या पाणी पातळीमध्ये वाढ होते व त्याचा रब्बी हंगामातील पिकांना सिंचनासाठी उपयोग होतो. वनराई बंधारा करण्यासाठी गेवराई येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे कृषी पर्यवेक्षक लहू चव्हाण, तुकाराम मुळक, कृषी मित्र पत्रकार वैजीनाथ जाधव, नारायण जाधव, अश्रूबा भोरे , रामेश्वर जाधव, गोपाळ हिंगे, अर्जुन वाघ सह आदी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

**जनतेच्या सेवेत सतत**...पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे पुन्हा एकदा आभार मानतो, असे ते म्हणाले. राज्यात मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे स्थिर सरकार आले आहे. या सरकारच्या माध्यमातून बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहीन, असेही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

**ओंकारेश्र्वर देवाचा**

चैतन्यदायी करण्यासाठी आयोजक कडाजीराव कोंडीबा जाधव,मा. शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव, विठ्ठल जाधव, मुंजाबा जाधव, ओंकार जाधव, जय जाधव, जगदीश जाधव, श्री जाधव, संभाजी पास्टे, शिवाजी चव्हाण, राहुल सुरवसे, कल्याण मोहिते, विष्णू कड, मुंजाबा थेटे यांच्यासह पवारवाडी येथील समस्त ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

**विजयी,पराभुत उमेदवार**

उमेदवाराला मदत करत आहेत हे दाखवुन देण्यात पटाईत आसतात पन ही वस्तुस्थिती नसते नेत्यांनी चांगले काम केलेले आसते त्यावर मत केलेले आसते पन श्रेय हे गावपुढारी घेऊन घर भरत आलेले आसतात आता मतमोजणी झाली आहे हिशोबाच्या पट्टीवर आलेल्या नेतेमंडळीवर हात मारावा त्यावर यांना समजेल या दुकानदार नेते मंडळीनी आपल्याला किती मताधिक्क दिले यावर यांचे वजन बघावे अन आपलाच कारभार सुधारुन घ्यावा नाही आपले पाढेपञ्चावन्न चलु द्या अन यांच्या म्हणन्यानुसार माणसे आडवा माणसे जिरवा असा कार्यक्रम पाच वर्षे चालू द्या असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**काळेगावात वाळु माफीयांचा**

दुसरीकडे वाळू माफिया रात्रीच्या वेळी धुमाकूळ सुरू आहे.यावर वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घेऊन अवैध रीतीने वाळू चालणाऱ्या ट्रॅक्टरवरून मालकावर कारवाई करण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्याकडून व्यक्त केली जात आहे. महसूल विभागाचे नेमलेले पथक वाळूमाफ्याच्या दावणीला आहे का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

### खरी शिवसेना असल्याचे निवडणुकीत जनतेच्या दरबारात सिद्ध

# शिंदेंची शिवसेना हीच खरी शिवसेना...!

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर



**जागा जिंकत शिक्कामोर्तब**

झाला. निकालाचे कल सकाळी दहा वाजेपर्यंत महायुतीच्या बाजूने राहिले आहे. महायुतीमधील शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी बहुमताचा आकडा गाठला आहे. त्याच वेळी खरी शिवसेना कोणाची? याचा कल मतदारांनी दिला आहे. उद्धव ठाकरे यापूर्वी जनतेच्या न्यायालयात शिवसेनेचा निकाल लागणार असल्याचे सांगत होते. आता विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून जनतेने आपला कौल दिला आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेनाला मतदारांनी पसंती दिली आहे. विधानसभेत ५० आमदारांपैकी एकजरी पडला, तर राजकारण सोडेन असे विधान शिंदे यांनी केले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ५८ हून अधिक जागांवर विजय आणि आघाडी मिळवत आपलीच खरी शिवसेना असल्याचे आज जनतेच्या दरबारात सिद्ध केले.

**आपल्या पक्षाचे स्थान बळकट**

जून २०२२ शिवसेनेत बंड झाल्यानंतर शिंदेंसोबत जवळपास ४० आमदार ठाकरेंना सोडून गेले. त्यावेळी उद्धव ठाकरे गटाकडून एकनाथ शिंदेंसोबत सर्व आमदारांवर घणाघाती टीका केली होती. मात्र शिंदे यांनी विरोधकांच्या टीकेला भीक न घालता अतिशय कार्यक्षमपणे, प्रशासनावर पकड ठेवत जनसामान्यांसाठी २४ तास उपलब्ध राहत, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, तसेच समाज हिताच्या वेगवेगळ्या योजना राबवत मतदारांना आपलेसे करण्यात एकनाथ शिंदे हे यशस्वी झाल्याचे दिसत आहे. उद्धव ठाकरे यांच्याबरोबर फराकत घेतल्यापासून शिंदे यांच्या शिवसेनेसमोर अनेक आव्हानांचा डोंगर उभा होता. त्यामध्ये शिंदे यांचे पुढील काही वर्षांत राजकीय किती अस्तित्व राहील असाही प्रश्न उपस्थित होत होता. मात्र शिंदे यांनी लोकसभेला सात खासदार निवडून आणत तसेच पुढे विधानसभेलाही तब्बल ५५ आपल्या पक्षाचे उमेदवार विजयी करत राज्यामध्ये आपल्या पक्षाचे स्थान बळकट केले आहे.

# मुंबईतही महायुतीचा बोलबाला

## भाजपा १५ जागा, शिंदे गटाच्या सहा, तर अजित पवार यांचा एका जागेवर विजय

◆ मुंबई (प्रतिनिधी) :



संपूर्ण राज्यभरात महायुतीने घवघवीत यश मिळवले असताना मुंबईतही ३६ जागांपैकी महायुतीला सर्वाधिक २२ जागांवर विजय मिळाला आहे. मुंबईच्या महत्त्वाच्या लढतीत कुलाबा मतदारसंघातून भाजपाच्या राहुल नार्वेकर यांनी काँग्रेसच्या हिरा देवासी यांचा ४८, ५८१ मतांनी पराभव केला. त्यांनी शिदे सेनेच्या शायना एन. सी. यांचा ३४८४४ मतांनी पराभव केला. मलबारहिल या उच्चभ्रू वस्तीच्या मतदारसंघातून भाजपाचे मंगल प्रभात लोढा यांनी आपला गड राखला आहे. त्यांनी उद्धव ठाकरे गटाचे भैरू चौधरी याचा ६८०१९ मतांनी पराभव केला आहे.

मुंबई हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला होता . मात्र शिवसेनेचे दोन गट झाल्यानंतर येथील समीकरण बदलले. ठाकरे यांची शिवसेना महाविकास आघाडीत काँग्रेस राष्ट्रवादीसोबत तर शिंदे यांची शिवसेना महायुतीत भाजपा, अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत आहे. महाविकास आघाडीत मुंबईत उद्धव ठाकरे गट सर्वाधिक २२ जागांवर, काँग्रेस, शरद पवार गट आणि समाजवादी पार्टी यांचे ११ उमेदवार रिंगणात होते, तर शिवसेना शिंदे गट १५ आणि भाजपाने १८ जागांवर उमेदवार उभे केले होते. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ३ जागांवर उमेदवार रिंगणात होते. मुंबईत ११ जागांवर शिंदे सेना विरुद्ध उद्धव सेना असा थेट सामना होता. ९ जागांवर उद्धव ठाकरे गट विरुद्ध भाजपा असा सामना होता, तर भाजपा आणि काँग्रेस सात जागांवर आमने- सामने होते. यात महायुतीने सर्वाधिक २२ जागा जिंकल्या आहेत.

भायखळा येथे लोकसभा निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागणाऱ्या शिवसेना शिदे गटाच्या यामिनी जाधव यांना विधानसभा निवडणुकीतही मुस्लीम, दलित मतांनी तारले नाही. त्यांचा ठाकरे गटाच्या मनोज जामसुतकर यांनी ३१३६१ मतांनी पराभव केला. जामसुतकर हे पहिल्यांदाच निवडून आले आहेत. शिवडी, वरळी, माहिम मतदारसंघ हे शिवसेनेचे बालेकिल्ले राहिले आहेत. शिवडीत शिवसेना ठाकरे गटाकडून अजय चौधरी यांना तिकीट मिळेल की नाही याची चर्चा होती. अखेर तिकिट मिळाले आणि त्यांनी शिवडीचा गड राखण्यात यश मिळवले. शिवडीत शिवसेना शिंदे गटाचे अजय चौधरी तर मनसेचे बाळा नांदगावकर यांच्यात लढत होती. येथे भाजपाने उमेदवार न देता मनसेला पाठिंबा दिला होता. मात्र भाजपाने तिकिट दिले नाही म्हणून बंडखोरी करीत येथे नाना आंबोले यांनी अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरले. मात्र येथे ठाकरे गटाच्या चौधरींनी बाजी मारली आहे. त्यांचा ७१४० मतांनी विजय झाला, तर सर्वांचे लक्ष लागलेल्या वरळी या मतदारसंघात ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे यांनी पुन्हा विजय खेचून आणला आहे. आदित्य ठाकरे यांचा पराभव करण्यासाठी भाजपा शिंदे सेना तसेच मनसेनेही कंबर कसली होती. आदित्य ठाकरेंविरोधात शिवसेना शिंदे गटाचे मिलिंद देवरा तसेच मनसेने संदीप देशपांडे यांना रिंगणात उभे केले होते. अटीतटीच्या तिरंगी लढतीत आदित्य ठाकरे यांनी विजयाचा झेंडा फडकवला आहे. त्यांचा ८८०१ मताधिक्यांनी विजय मिळवला आहे.

माहिम मतदारसंघातील लढतीकडे राज्याचे लक्ष लागले होते. येथे राज ठाकरे यांनी पुत्र अमित ठाकरे यांना पहिल्यांदाच निवडणुकीच्या रणांगणात उतरवले होते. महायुतीने त्यांना पाठिंबाही देण्याचे जाहिर केले होते. मात्र ऐनवेळी शिंदे गटाचे सदा सरवणकर यांनी उमेदवार अर्ज भरला. ठाकरे गटानेही येथे महेश सावंत यांना उभे केले. त्यामुळे येथे तिरंगी लढत होती.. मात्र मत विभाजनचा फायदा घेत ठाकरे गटाच्या महेश सावंत यांनी १,३१६ मताधिक्यांनी रण जिंकले. वडाळा मतदारसंघात शिंदे गटाच्या कालिदास कोळंबकर यांनी नवव्यांदा निवडून येत विक्रम रचला आहे. त्यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या श्रद्धा जाधव यांचा २४,९७३ मतांनी पराभव केला आहे. त्यांचा विधानसभा निवडणुकीत यापूर्वीही पराभव झाला होता. मुंबई महापालिका निवडणुकीत मात्र जाधव तब्बल सातवेळा निवडून आल्या होत्या. धारावी मतदारसंघात काँग्रेसने आपला गड राखला आहे. दिवंगत एकनाथ शिंदे यांच्या कन्या व खासदार वर्षा गायकवाड यांच्या बहीण डॉ. ज्योती गायकवाड यांनी विजय मिळवला आहे. त्यांनी शिंदे सेनेचे संजय खंदारे यांचा २३, ४५९ मतांनी पराभव केला. चेंबूर येथे दोन्ही शिवसेनेच्या उमेदवारांमध्ये अटीतटीच्या लढतीत शिवसेना शिंदे गटाचे तुकाराम काते यांनी ठाकरे गटाच्या प्रकाश फातर्पेकर यांचा पराभव केला.

अणुशक्ती नगर येथे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षातर्फे सना मलिक यांनी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे फहाद अहमद यांचा ३३७८ मतांनी पराभव केला.

### महाविकास आघाडीचा सुपडा साफ

# लाडकी बहीण योजना ठरली गेमचेंजर ; त्यामुळे सगळे पडले उताणे : अजित पवार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. या विजयानंतर शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादीची एकत्र पत्रकार परिषद झाली. या वेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित



पवार यांनी महाविकासआघाडीवर टीका केली आणि जनतेने दिलेल्या प्रेमामुळे आभार मानले. अजित पवार म्हणाले की, काल अनेकांच्या गाड्या चालवणे सुरू होते. कालच चित्र पाहिले तर आम्ही त्यात कुठे ही नव्हतो. आम्हाला तर असे वाटत होते की, आमचाच गेम होईल की काय... पण महाराष्ट्राच्या जनतेने प्रचंड यश दिले. त्यासाठी त्यांचे मनापासून आभार मानतो. आमच्या योजनांबाबत चेष्टा करण्यात आली. परंतु नंतर त्यांच्याच जाहीरनाम्यात कोणतेही हिशोब न देता त्या दिसल्या. लोकसभेत इतके अपयश मिळेल असे वाटले नव्हते. लाडकी बहीण योजना, शासन आपल्या दारी अशा योजनांमुळे लोकांना लाभ मिळाला. हे फक्त बोलणार सरकार नाही तर करून दाखवणारे सरकार आहे. असे देखील अजित पवार म्हणाले.

**ऐतिहासिक विजय : मुख्यमंत्री शिंदे**

: महाराष्ट्रातील हा ऐतिहासिक विजय आहे. ही निवडणूक लोकांनी हातात घेतली होती. लोकांनी प्रेमाचा वर्षाव केला. लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी या योजनेमुळे ऐतिहासिक विजय मतदारांनी दिला. गेल्या २ वर्षांत जे आम्ही काम केलं. जे निर्णय घेतले ते इतिहासातील न भूतो आणि न भविष्यती असे निर्णय होते. महाविकास आघाडीने सर्व कामे थांबवली होती. पण ती सर्व कामे आम्ही सुरू केली.

**आमच्यावर जबाबदारी वाढली : अजित पवार**

'लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. त्यामुळे सगळे उताणे पडले. आता आमच्यावर जबाबादारी वाढली आहे. इतके मोठे यश महाराष्ट्रात कोणाला मिळाले नव्हते. आमच्या पाठिशी केंद्र सरकार आहे. त्यामुळे मोठा आधार आहे. लोकसभेचा निकाल लागला, तर तो बरोबर आणि इथला निकाल लागला की बॅलेट पेपर आल पाहिजे. असे नसते. वेगवेगळ्या रिजनमध्ये महायुतीला यश मिळाले आहे. काही जागा खूप कमी मतांनी गेल्या आहेत.' असेही अजित पवार म्हणाले.

## प्रत्येक महाराष्ट्रवासीयांचा हा विजय : अमित शहा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

आजवर केलेल्या विकासकामांमुळे महायुतीने जनतेचा विश्वास जिंकला आहे. केंद्रात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार असल्यामुळे राज्याच्या विकासासाठी राज्यात महायुतीचे सरकार आणण्याचा निश्चय जनतेने केला आहे. त्यामुळेच महायुतीच्या उमेदवारांना राज्यभर प्रतिसाद मिळत आहे.

राज्यात १६० पेक्षा जास्त जागांवर महायुतीचा दणदणीत विजय होणार, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी विश्वास दर्शवला होता. महाराष्ट्रात महायुतीने ऐतिहासिक विजय मिळवत महाविकास आघाडीचा सुपडा साफ केला



आहे. या विजयाबद्दल भाजपाचे नेते अमित शहा यांनी ट्विटद्वारे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

# भाजपा नेते प्रवीण दरेकरांनी साधला संजय राऊतांवर निशाणा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

### ...तर राज ठाकरेंचे केले कौतुक

भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी पुन्हा एकदा संजय राऊतांवर निशाणा साधला आहे. संजय राऊतांचा दर्जा किती घसरला आहे हे ते स्वःताच वारंवार दाखवत असल्याची टीका दरेकर यांनी केली आहे. पुढे बोलताना दरेकर म्हणाले की, संजय राऊत हे बाळासाहेबांचे काम विसरले आहेत. अल्टीमेटम हा बाळासाहेबांकडून दिला जात होता. मात्र आता संजय राऊत नुसतेच बोलतात. सजंय राऊत कोण आहेत, त्यांचा जीव किती ते बोलतात किती असा टोला देखील यावेळी दरेकरांनी संजय राऊतांना लगावला आहे. याचबरोबर प्रवीण दरेकर यांनी राज ठाकरेंच्या भूमिकेचे स्वागत देखील केले आहे. राज ठाकरेंच्या भूमिकेचे मी स्वागत करतो, ते सर्व गोष्टी शांततेत करत असल्याचे दरेकर यांनी म्हटले आहे.

पवारांचे योगदान नाकारता येणार नाही, मात्र राज्याचा सात बारा काय एकट्या शरद पवारांच्याच नावावर आहे का? मग शरद पवार यांचा अपमान म्हणजे संपूर्ण राज्याचा अपमान कसा होऊ शकतो. त्यामुळे महाविकास आघाडीमधील नेत्यांनी या भ्रमातून बाहेर पडावे असे दरेकरांनी म्हटले आहे.

**राज ठाकरेंच्या भूमिकेचे स्वागत :** यावेळी बोलताना दरेकर यांनी राज ठाकरेंच्या भूमिकेचे स्वागत केले आहे. राज ठाकरे यांच्या भूमिकेचे स्वागत करतो. राज ठाकरे सर्व गोष्टी शांततेत करत आहेत. याचा आर्थ त्यांनी माघार घेतली असा होत नाही. त्यांनी चार पाऊले पुढे जाण्यासाठी एक पाऊल मागे घेतल्याचे दरेकर यांनी म्हटले आहे. सामनामधून राज ठाकरे यांच्यावर टीका करण्यात आली आहे. या टीकेला देखील दरेकरांनी अप्रत्यक्ष प्रतित्युत्तर दिले आहे.

# ठाण्यात केदार दिघेंचे डिपॉझिट जप्त

## कोपरी-पाचपाखाडी हा मुख्यमंत्री शिंदेंचा अभेद्य गड

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

शिवसेनेचे दिवंगत जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या विचारांचे खरे वारसदार आपणच असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे. कोपरी-पाचपाखाडी या आपल्या बालेकिल्ल्यात विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे केदार



दिघे यांचा केवळ दारुण पराभव केला नसून त्याच्यांवर डिपॉझिटही जप्तीची नामुष्की आणली आहे. ठाकरे गटाने आनंद दिघे यांच्या पुतण्याला उमेदवारी देऊन दिघे कार्ड खेळण्याचा प्रयत्न केला होता. पण येथील मतदारांनी गेली पंधरा वर्षे आमदार, मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी केलेल्या विकासकामांना तब्बल १ लाख ५९ हजार ६० मतांचे दान देत सर्वाधिक १ लाख २० हजार ७१७ इतके मताधिक्य दिले आहे.

कोपरी- पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघ हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अभेद्य गड मानला जातो. २०२४ ची निवडणूक ते मुख्यमंत्री म्हणून लढवत होते. अडीच वर्षांपूर्वी राज्यात झालेल्या सत्तांरणाचे केंद्रबिंदू ठाणे ठरले असल्याने मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघातील लढतीलाही विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. पण ठाण्यात ठाकरे गटाचा जोर ओसरल्यामुळे मुख्यमंत्र्यांना तोडीस तोड देणारा उमेदवार नव्हता. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाने दिघे कार्ड खेळत आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांना मैदानात उतरवले. एकीकडे मुख्यमंत्री निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्य पिंजून काढत असताना त्यांच्या शिलेदारांनी या मतदारसंघात त्यांच्या विजयाची धुरा सांभाळली. हा विजय विक्रमी व्हावा तसेच विरोधकांचे डिपॉझिट जप्त होईल अशी रणनिती येथे आखण्यात आली.

मतमोजणीला वागळे येथील आयटी पार्क येथे सुरुवात होताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पहिल्या फेरीपासून आघाडीवर होते. शेवटच्या फेरीपर्यंत त्यांनी मताधिक्यांची आघाडी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मतमोजणीत एकूण १ लाख ५९ हजार ६० मते मिळाली, तर शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार केदार दिघे यांना ३८ हजार ३४३ मतांपर्यंतच मजल मारता आली. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार एकूण मतांच्या १६.६ टक्के मते उमेदाराला न मिळाल्यास डिपॉझिट जप्त होते.

**मताधिक्याकडे दृष्टीक्षेप**

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना किमान एक लाखांच्या पुढे मते
- २०२४ च्या निवडणुकीत कोपरी पाचपाखाडीमध्ये एकूण ३लाख ३९ हजार ५२६ मतदार होते. त्यापैकी २ लाख ०३ हजार २०६ मतदान झाले. या एकूण मतदानापैकी एकनाथ शिंदे यांना तब्बल १ लाख ५९ हजार ६० इतकी मते मिळाली.
- शिवसेना ठाकरे गटाच्या केदार दिघे यांना ३८ हजार ३४३ मते
- २०१९ मध्ये या मतदारसंघात एकूण १ लाख ७३ हजार इतके मतदान झाले. त्यापैकी १ लाख १३ हजार ४९७ इतके भक्कम मतदान केवळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पारड्यात पडले होते. मतदारसंघामध्ये ५१४७ नोटा पडल्या होत्या.
- २०१४ साली या मतदारसंघात एकूण १ लाख ८४ हजार ६०५ मतदान झाले. शिवसेना उमेदवार एकनाथ शिंदे यांना १ लाख ३१६ इतकी मते मिळाली होती.
- २००९ साली १ लाख ६२ हजार ३८ एकूण मतदान झाले. त्यापैकी ७३ हजार ५०२ मते एकनाथ शिंदे यांना मिळाली होती.

## झारखंडमध्ये 'इंडिया'चा निर्विवाद विजय

**नवी दिल्ली :** शनिवारी झालेल्या दोन राज्यांतील मतमोजणीमध्ये महाराष्ट्रात भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीला दणदणीत विजय मिळाला आहे. मात्र दुसरीकडे झारखंडमध्ये भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएला पराभव पत्करावा लागला. झारखंडमधील विधानसभेच्या ८१ जागांपैकी ५५ जागांवर विजय मिळवत इंडिया आघाडीने बहुमत मिळाले तर भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएला केवळ २५ जागा मिळाल्या आहेत. झारखंडमध्ये बंपर विजय मिळवणाऱ्या इंडिया आघाडीला ८१ पैकी ५५ जागा मिळाल्या आहेत. झारखंड मुक्ती मोर्चा पक्षाला ३४, काँग्रेसला १६, राजदला ४, सीपीआयएमएल पक्षास २ जागा मिळाल्या.

## लोकसभा निवडणुकीत नांदेड, वायनाडमध्ये काँग्रेस विजयी

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

लोकसभा पोटनिवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील नांदेडमध्ये काँग्रेस पक्षाचे रवींद्र वसंतराव चव्हाण, तर केरळमधील वायनाडमध्ये काँग्रेसच्या प्रियंका गांधी विजयी झाल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या नांदेडच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे वसंत चव्हाण यांनी विजय मिळवला होता. त्यावेळी त्यांनी प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा पराभव केला होता; परंतु लोकसभा निवडणुकीच्या दोन महिन्यांत वसंत चव्हाण यांचे निधन झाले. त्यामुळे नांदेडमध्ये पोटनिवडणूक झाली. या पोटनिवडणुकीत काँग्रेसकडून रवींद्र चव्हाण मैदानात होते. तर भाजपाकडून डॉ. संतुक हंबार्डे मैदानात होते. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेस पक्षाचे रवींद्र वसंतराव चव्हाण हे १४५७ मतांनी विजयी घोषित करण्यात आले. त्यांनी भाजपाचे संतुकराव हंबर्डे यांचा निसटता पराभव केला. विशेष म्हणजे यावेळी फेर मतमोजणीची मागणी करण्यात आल्याने टपाली मतदानाची पुन्हा मोजणी करण्यात आली. त्यामध्ये काँग्रेसच्या उमेदवाराचा विजय झाला.

काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचा केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघात ४ लाख १० हजार मतांपेक्षा अधिक मतांनी विजय झाला. त्यानंतर त्यांनी वायनाडच्या जनतेचे आभार मानले आहेत. जनतेने टाकलेल्या विश्वासाबद्दल प्रियंका गांधी यांनी भारावून गेल्याचे म्हटले आहे. प्रियंका गांधी म्हणाल्या की, माझी आई सोनिया गांधी, पती रॉबर्ट वाड्रा यांनी दिलेल्या प्रेम आणि धैर्याबद्दल कधीही कृतज्ञता पुरेशी नाही.

# काँग्रेसच्या पटोले, थोरात, चव्हाण, ठाकरेंसह यशोमती ठाकूर यांना मतदारांचा धक्का

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, राज्याचे विधानसभेतील विरोधी



पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यासह माजी मंत्री यशोमती ठाकूर, माणिकराव ठाकरे अशा काँग्रेसच्या दिग्गजांना मतदारांनी धक्का दिला आहे. राज्यात आमचीच सत्ता येईल, तसेच काँग्रेसचा मुख्यमंत्री होईल, असा दावा करणारे दिग्गज नेते स्वतःचाच मतदारसंघ वाचवू शकले नाहीत. त्यामुळे राज्यातील काँग्रेसचा हा मोठा पराभव मानला जात आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीने काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. सत्ता स्थापनेचा दावा करणारे काँग्रेसवर आता अनेक मतदारसंघातील महत्त्वाचे नेते गमावण्याची नामुष्की ओढावली आहे. इतकेच नाही तर काँग्रेसमधून मुख्यमंत्री पदाचा दावा ठोकणाऱ्या प्रमुख नेत्यांचा देखील पराभव झाला आहे. त्यातही ज्या नेत्यांचा विजय झाला, तो देखील अवघ्या काही मतांनी निसटचा विजय मिळाला असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे काँग्रेसचा राज्यात सुपडा साफ झाला असल्याचे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**सर्वात मोठे दावेदार थोरात पराभूत :** अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब भाऊसाहेब थोरात हे पराभूत झाले आहेत. थोरात हे काँग्रेसचे मुख्यमंत्री पदाचे दावेदान मानले जात होते. तसेच सध्या राज्यातील सर्वात ज्येष्ठ नेते म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. मात्र, स्वतःचा मतदार संघ राखण्यात त्यांना यश आले नाही. त्यामुळे हा पराभव काँग्रेसच्या जिव्हारी लागण्याची शक्यता आहे.

# मनसेचे अमित ठाकरे पराभूत

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

शिवसेना ठाकरे गट आणि मनसेचा बालेकिल्ला असलेल्या माहीम विधानसभा मतदारसंघाचे चित्र स्पष्ट झाले आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित ठाकरे यांचा पराभव झाला आहे. येथे महेश सावंत विजयी झाले आहेत. माहीम सुरुवातीपासून शिवसेना ठाकरे गटाचा बालेकिल्ला राहिला आहे. मात्र,



राज ठाकरेंनी शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र करून स्वतःचा पक्ष स्थापन केल्यामुळे या विधानसभेत मराठी मतांची विभागणी होऊन, शिवसेनेच्या बालेकिल्ल्याला खिंडार पडले होते. २०१४ व २०१९ची विधानसभा निवडणूक शिवसेनेने जिंकली. २००९ मध्ये मनसेची लाट असल्यामुळे या मतदारसंघात मनसेचे नेते नितीन सरदेसाई निवडून आले होते. त्यानंतर २०१२ मध्ये झालेल्या महानगरपालिका निवडणुकीतही माहीम मतदारसंघात मनसेचे नगरसेवक निवडून आले; पण मनसेला माहीम मतदारसंघावर वर्चस्व टिकवता आले नाही. २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघात मराठी मतांची विभागणी होऊनही शिवसेनेचे सदा सरवणकर निवडून आले होते. विशेष म्हणजे त्यावेळी भाजपनेही माहीममधून निवडणूक लढवली होती. यात त्यांनी तब्बल २४ टक्के मते घेतली होती. त्यामुळे शिवसेनेला येथे ५९०० चे मताधिक्य मिळाले. २०१९ मध्ये मात्र सरवणकर यांनी विजय मिळवला होता.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह उपमुख्यमंत्री फडणवीसांनी मानले आभार

# विकासकामांना जनतेने पोहोचपावती दिल्याने महायुतीचा दणदणीत विजय

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

विधानसभा निवडणूक निकालात महायुतीने जोरदार प्रदर्शन केले आहे. दोनशे जागा महायुतीने जिंकल्या आहेत. त्यामुळे हा महाविकास आघाडीसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

या विजयानंतर महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जोरदार जल्लोष सुरू केला आहे. कुठे मिठाई वाटत, तर कुठे ढोल-ताशे वाजवत कार्यकर्ते आनंद साजरा करत आहेत. या निकालावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली.

'राज्यात लाडकी बहीण, लाडके भाऊ, लाडके शेतकरी यांच्यामुळे आमचा विजय होत आहे. मुख्यमंत्रीपदाबाबत बोलताना ते म्हणाले, आम्ही केलेल्या विकासकामांची जनतेने पोचपावती दिली. या विजयामुळे पुढील काळात आमची जबाबदारी वाढणार आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याच्या हेतूने 'लाडकी बहीण योजने'ची घोषणा महायुती सरकारने केली होती. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रुपये जमा करण्याची तरतूद करण्यात आली होती. या योजनेचा लाभ मिळाला. या योजनेचा जोरदार प्रचार पक्षांनी केला होता. रकमेत वाढ करण्याचे आश्वासनही महायुती सरकारने दिले होते.

**मतदारांपुढे महायुती नतमस्तक**



विधानसभेत महायुतीचा ऐतिहासिक विजय झाला आहे. आतापर्यंतच्या अनेक वर्षांचा निवडणुका आपण पाहिल्या, मात्र अशा पद्धतीने लोकांनी हातात घेतलेली निवडणूक आपण पाहिली नसल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रासाठी आजचा दिवस ऐतिहासिक असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. लाडक्या बहिणी असतील, लाडके भाऊ असतील किंवा लाडके शेतकरी असतील या सर्वांनी महायुतीवर मनापासून प्रेम दाखवले आहे. त्या सर्वांचे आभार मानताना या ऐतिहासिक विषयासाठी सर्वांना दंडवत घातला पाहिजे, अशा शब्दात मतदारांचे आभार देखील शिंदे यांनी मानले.

**जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही - फडणवीस :** महाराष्ट्राच्या जनतेसमोर महायुती नतमस्तक असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. महायुतीवर महाराष्ट्राने दाखवलेला हा विश्वास आहे. त्यामुळे आम्हाला आता मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात काम करावे लागणार असल्याची जाणीव होत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. म्हटले आहे. इतकेच नाही तर त्यांना मतदारांना आश्वस्त करतो की, जनतेने आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला आम्ही तडा जाऊ देणार नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सूचनेनुसार अधिकाऱ्यांची घेतली बैठक


# डेहराडून येथे असलेले 'राष्ट्रपती आशियाना' जनतेसाठी खुले होणार

◆ डेहराडुन (प्रतिनिधी) :

डेहराडूनच्या राजपूर रोडवर असलेले ऐतिहासिक राष्ट्रपती आशियाना एप्रिल महिन्यापासून सर्वसामान्यांसाठी खुले होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सूचनेनुसार, राष्ट्रपती सचिवालयाच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी डेहराडून गाठले, राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि आशियाना येथे जनतेसाठी आवश्यक सुविधा पुरविण्याच्या सूचना दिल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सूचनेनुसार, आता डेहराडूनमधील १८६ वर्षे जुनी राष्ट्रपती आशियाना सर्वसामान्यांसाठी खुली करण्यात येत आहे. २१ एकर परिसरात पसरलेले हे कॉम्प्लेक्स सध्या प्रेसिडेंशियल बॉडी गार्ड वापरत आहे. सामान्य जनतेसाठी संकुल सुरू करण्यापूर्वी आवश्यक तयारीसाठी आशियाना संकुलातील राष्ट्रपती सचिवालयातील अतिरिक्त सचिव डॉ. राकेश गुप्ता यांनी शनिवारी एका उच्चस्तरीय बैठकीत उत्तराखंड सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. कॅम्पसच्या मुख्य इमारतीत सर्वसामान्यांना प्रवेश मिळेल, असा निर्णय घेण्यात आला. यावेळी, राष्ट्रपती आशियानासह, लोकांना भारतीय सैन्याच्या २५१ वर्ष जुन्या रेजिमेंट पीबीजीचा इतिहास आणि त्याच्या १८६ वर्षे जुन्या स्थिरतेशी परिचित होण्याची संधी देखील मिळेल.

वॉक दरम्यान, लोकांना कॅम्पसमधील सुंदर बाग आणि कॅफेटेरियाचा आनंद देखील घेता येईल. संकुल सर्वसामान्यांसाठी खुले करण्यापूर्वी वीज, पाणी, पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. पीबीजी सीओ कर्नल अमित बेरवाल, ओएसडी स्वाती शाही यांच्यासह उत्तराखंड सरकारचे सचिव शैलेश बागोली, सचिन कुर्वे, पंकज कुमार पांडे, डेहराडूनचे डीएम स्वीन बन्सल आणि इतर अधिकारी या बैठकीत उपस्थित होते. यापूर्वी राष्ट्रपतींच्या सूचनेनुसार हैदराबादमधील राष्ट्रपती निलयम आणि मशोब्रा येथील राष्ट्रपती निवासही सर्वसामान्यांसाठी खुले करण्यात आले आहेत.

# 'वाढत्या प्रदूषणामुळे लोकांचे आरोग्य आणि देशाच्या प्रगतीवर परिणाम..!'



**स्नेहा राज**
9967015899

राजधानी दिल्लीतील हवेची गुणवत्ता ' ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन' किंवा एसक्यूआय/ग्रॅप्रे तरतून दिलेल्या स्तरांपैकी ग्रॅप ४ या धोक्याच्या पातळीवर पोहोचण्यापूर्वीच जर सूचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी केली असती तर आज दिल्लीतील शाळाही संस्था बंद ठेवण्याचे आदेश तेथील प्रशासनाला द्यावे लागले नसते. आज दिल्लीसारखी प्रदूषणावस्था मध्य प्रदेश, पंजाब, चंदिगढ, राजस्थान आणि दिल्ली सीमेनजीकच्या राज्यांची झाली आहे. पंजाबमधील प्रदूषण पातळी चौपट वाढली असून, दिल्ली, हरयाणामधील शाळांमध्ये ऑनलाइन पद्धतीने अभ्यासक्रम सुरू ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. त्याचवेळी श्रीनगर येथे बर्फवृष्टीचा परिणाम होऊन तेथील तापमान ४०.७ अंशांवर नोंदविले गेल्यामुळे सरकार आणि पर्यावरण तज्ज्ञ चिंतेत आहेत. जगातील सर्वात प्रदूषित असणाऱ्या ५० शहरांपैकी ३९ शहरे भारतात आहेत. त्यातील प्रथम पाच प्रदूषित शहरांमध्ये दिल्लीचा समावेश होतो हे ध्यानात घ्यायला हवे. याच प्रदूषणामुळे अस्थमा, कर्करोग, फुफ्फुसांचे आजार उद्भवल्याने नागरिकांचे आरोग्य बिघडत चालले आहे.

दिल्लीच्या परिसरात असणारी ३०० किलोमीटर परिघात सुमारे दहाहून अधिक औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प आहेत ज्यामध्ये कोळसा जाळून वीज निर्माण केली जाते. दिल्ली शेजारील राज्यांतील शेतकरी मशागत करताना झाडा झुडपांना आगी लावून जमीन रापवितात त्यावेळी होणारा धूर आणि औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांनी निर्माण केलेला धूर आणि कोळशाची राख यामुळे दिल्ली शहर काळवंडून निघते तसेच प्रदूषणाचा उच्च स्तर गाठत असते. परंतु औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पदेखील प्रदूषणास कारणीभूत ठरतात, त्यांच्याविरोधात फक्त वीज निर्मिती केली जाते म्हणून गाजावाजा केला जात नाही तर शेतकरीवर्ग मशागतीसाठी पराळी जाळतात त्याची सर्वत्र प्रसिद्धि केली जाते आणि गेली काही वर्षे नुसती आरडाओरड केली जात आहे. प्रदूषण नियंत्रण आणण्यासाठी किंवा त्यावर उपाययोजना करण्याऐवजी राजकारण केले जाते यांत दिल्ली आणि परिसरातील लोकं आपल्या आरोग्याची किंमत मोजत आहेत.

प्रदूषणाबाबत चीनने आयोजिलेल्या कार्यक्रमांमुळे प्रदूषणाविरोधात उपाययोजना करून बीजिंग ऑलिंपिक स्पर्धा यशस्वी केल्या तेव्हा प्रदूषणावर मात करून. आज चीनमध्ये प्रदूषित शहरे असूनसुद्धा चीनचा सर्वाधिक प्रदूषित देशांत समावेश होत नाही तर भारताचा वरचा क्रमांक लागतो, त्यापाठोपाठ पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ आणि इंडोनेशिया हे देश आहेत. चीनने लोकसंख्या व प्रदूषण नियंत्रण ऑलिंपिक स्पर्धेतील पदके पटकावण्यात फारच प्रगती साधत महासत्ता बनण्याच्या दिशेने केलेली कूच पाहता भारताकडून चीनशी तुलना आणि स्पर्धा करताना आपल्या देशातील नेते महासत्ता बनण्याच्या घोषणा करण्यात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. त्याची टप्प्याटप्प्यांवर प्रचिती येईल अशा प्रत्यक्ष कृती आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि देशातील जनतेच्या नजरेत भरेल या स्तरांवर दिसू शकल्यास सर्वांचीच खात्री पटेल असे वाटते.'

**गोरेगाव, मुंबई**

## राशी-भविष्य — दि.२४ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२४

**दिनविशेष:- दि.२४ नोव्हेंबर:-** मनिरामबाबा पुण्यतिथी, गुरू तेगबहादुर शहिद दिन, आबाजी महाराज यात्रा, (वर्धा), **दि. २६ नोव्हेंबर:-** उत्पत्ती एकादशी- आळंदी यात्रा, **दि.२७ नोव्हेंबर:-** जनार्दनस्वामी पुण्यतिथी, एकवीरादेवी (अमरावती), **दि.२८ नोव्हेंबर:-** महात्मा ज्योतीबा फुले पुण्यतिथी, दासगणू महाराज पुण्यतिथी- पंढरपूर, ज्ञानेश्वर महाराज समाधी उत्सव आळंदी, रंगनाथ महाराज पुण्यतिथी नव्हा (जालना), **दि.२९ नोव्हेंबर:-** शिवरात्री, **दि.३० नोव्हेंबर:-** दर्श अमावास्या प्रा.स.११.२९ मि. जनार्दन स्वामी जयंती (नागपूर).

मेष
**व्यवसायात तडजोड.**
व्यवसायात काही तडजोड स्वीकारावी लागेल. इच्छा नसतांना, मनाला पटत नसेल तरी आपणास काही गोष्टी कराव्या लागतील. कामानिमित्त प्रवास घडेल. समोरची व्यक्ती किती प्रामाणिक आहे, याची खात्री करूनच आपल्या योजना उघड करा.

वृषभ
**आर्थिक स्थिती समाधानकारक.**
आर्थिक स्थिती ही सर्वसाधारण समाधानकारक राहील. चढ-उतार होत राहील. बेरोजगारांना नोकरीसाठी सतत पाठपुरावा करूनच यश मिळेल. व्यवसायिकांनी धाडसी पाऊल उचलू नका. खर्चावर नियंत्रण ठेवा. अनावश्यक खर्चिक वस्तू विकत घेऊ नका.

मिथुन
**संतुलन राखा.**
आपण आपल्या व्यवसाय/नोकरीची कामे करताना संतुलन राखा. सर्व गोष्टीचा विचार करून कामे करा, फक्त एकाच गोष्टीचा/ आपलाच विचार करू नका. एखाद्या मोहाला बळी पडून नसती झंजट मागे लावून घेऊ नका. कामाशी काम ठेवत जा.

कर्क
**प्रगती होईल.**
आपली प्रगतीची वाटचाल उत्तम होत असल्याचे दिसून येईल. व्यवसाय, साहित्य कला, संगणक क्षेत्रातील व्यक्तीची अपेक्षित दिशेने घोडदौड सुरू राहील. व्यवसाय/ नोकरीत आलेली कुठलीही संधी सोडू नका. आपली जिद्द/ मेहनत याच्या जोरावर यशस्वी व्हाल.

सिंह
**प्रलंबित कामे होतील.**
आपली बऱ्याच दिवसापासूनची रखडलेली कामे येणाऱ्या दिवसात पूर्ण होतील. शिक्षण/ संशोधन, क्रीडा, न्याय क्षेत्रातील कार्यरत असणाऱ्यांना प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करता येईल. मंगलकार्यानिमित्त नातेवाईकांच्या भेटीत/ सहवासात वेळ मजेत जाईल.

कन्या
**अनपेक्षित लाभ.**
व्यवसायात काही अनपेक्षित ऑर्डर्स मिळून अनपेक्षित लाभ मिळेल. स्थावर इस्टेटीबाबत कोर्टात सुरू असलेले वाद निकाली लागून कोर्टाच्या कटकटीतून सुटका होईल. आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा सुधारेल. समाजकारणातील व्यक्तींना शुभयोग येतील.

तूळ
**नव्या दिशा.**
आपल्याला नव्या दिशा/ मार्गदर्शन मिळेल. वरिष्ठांचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल. आपल्या व्यवसायातील योजना कृतीत उतरविण्यासाठी प्रयत्न करीत राहा. नियोजन करून कामे करा. राजकारणापासून जेवढे दूर राहाल तेवढे बरे. आरोग्याच्या तक्रारी हळूहळू वाढण्याची शक्यता आहे. तेव्हा आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

वृश्चिक
**मनोरंजनासाठी वेळ द्याल.**
व्यस्त जीवनशैलीतून घरी येणाऱ्या पाहुण्यांसोबत आपण मनोरंजनासाठी वेळ द्याल. ते तुम्हालाही आवश्यक आहे. थोडा वेळ काढून आनंद घेणे, पुढील कामासाठी उर्जा वाढविणारे ठरेल. कुटुंबातील ज्येष्ठांच्या विक्षिप्त लहरी वागण्याने तुम्ही त्रासून जाल. पण वास्तविक परिस्थिती समजून घ्यावी लागेल.

धनू
**मध्यस्थी करू नका.**
कुणाच्याही कौटुंबिक वादात पडून मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करू नका. त्यांचे वादात पडूच नका. नसता मानसिक त्रास होईल. जोडीदाराची मनस्थिती समजून घ्या. त्यांच्याबद्दल आपुलकी / प्रेम कसे वाढेल, याचे चिंतन करा. विद्यार्थीवर्गानी यशाचा पल्ला गाठण्यासाठी प्रयत्न वाढवावे.

मकर
**सकारात्मक विचार फायद्याचे.**
आपण आपला दृष्टीकोन सकारात्मक ठेवून कामे केल्याने फायदा होईल. कामे करतांना विचार चांगले ठेवा. चांगलेच होईल. भुतकाळातील गोष्टींना विसरा. आपला कामावरील आत्मविश्वास वाढेल. आपले नावलौकिक होईल. वरिष्ठ पातळीवरील व्यक्ती आपली चौकशी करतील.

कुंभ
**वरचा आवाज टाळा.**
आपण आपल्या कार्यक्षेत्रात असो की घरी असो सर्वांशी वागता बोलतांना वरच्या आवाजात बोलू नका. रागावर नियंत्रण ठेवा. संयम व शांतता राखण्याचा सदैव प्रयत्न करा. प्रवासाचे नियोजन बदलावे लागेल. दुरवरच्या मित्र/ नातेवाईकाकडून सुखद समाचार मिळतील.

मीन
**खेळाडूंना यश मिळेल.**
खेळाडूंना त्यांच्या खेळात उत्तम यश मिळवून ते चमकतील. त्यांच्यावर शुभेच्छा/ अभिनंदनाचा वर्षाव होईल. व्यवसायातील जुनी येणे वसुल होईल. व्यवहारासाठी आर्थिक मदतीची गरज पडेल. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

**।। इति शुभं भवतू।।**

**अविनाश अंजनकर**, अकोला

## अन्वयार्थ

# 'मणिपूर: अजीब दास्तां है ये....!'



**न.मा. जोशी**
8805948951

काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी पंतप्रधान मोदी यांच्याकडे मागणी केली आहे, की मोदी यांनीदेखील आता राजकारण बाजूला ठेवत मणिपूरला भेट द्यावी. मणिपूरच्या जनतेला सामान्य स्थिती, शांतता आणि सद्‌भाव हवा आहे. भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांनी काँग्रेसवर केलेली टीका म्हणजे नकार, विकृती, विक्षेप आणि बदनामीचे प्रतीक आहे! पंतप्रधान मणिपूरला कधी भेट देणार? बहुमत गमावलेले मुख्यमंत्री वीरेंद्र सिंग किती दिवस खुर्चीला चिकटून राहणार? पूर्ण कालीन राज्यपालांची नियुक्ती कधी करणार? गृहमंत्री अमित शहा मणिपूरमध्ये शांतता कायम करण्यास असफल झाल्याची जबाबदारी स्वीकारणार की नाही? काँग्रेसने उपस्थित केलेल्या या प्रश्नांची उत्तरे मोदी सरकारकडून मिळण्याची अपेक्षा व्यर्थ आहे.



१९६० मध्ये राज कुमार आणि मीना कुमारी यांचा 'दिल अपना और प्रीत पराई' हा अत्यंत दर्द भरा चित्रपट आला होता. या चित्रपटातील

**'अजीब दास्तां है ये**
**कहां शुरू कहा खतम**
**ये मंजिले है कौन सी**

न वो समझ सके न हम' हे हृदय चर्र करणारे गीत आजही अंतकरण अस्वस्थ करून टाकते. १९८३च्या रजिया सुलतान चित्रपटातील 'जलता है बदन' गीताची आठवणदेखील अशीच अस्वस्थ करीत आहे. कारण लक्षात आलेच असेल. 'जलता है मणिपूर' पाहिला आणि पंतप्रधानांचे या प्रकरणी मौन पाहिले, की म्हणावेसे वाटते 'अजीब दास्तां है ये'. मणिपूरसारखी अशांतता दुर्दैवाने यापूर्वी पंजाब, जम्मू-काश्मीर, तामिळनाडू, आसाम आणि इतर अनेक ईशान्येकडील राज्यांमध्ये होती; पण इंदिरा गांधी आणि राजीव गांधी या दोन पंतप्रधानांनी शांततेसाठी आपले प्राण गमावले. मणिपूरची परिस्थिती अशी आहे, की सर्व तणाव आणि अशांतता असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी बेफिकीर आहेत. जिथे विरोधी पक्षनेते राहुल गांधी दोनदा जाऊन आले तेथे पंतप्रधान एकदाही गेले नाहीत. निवडणुकांमध्ये प्रचार करायला त्यांना वेळ आहे, ब्राझील, नायजेरिया, गयाना देशांचे दौरे करायची फुरसत आहे. मणिपूरची स्थिती आज 'मुझे मेरे हाल पे छोड दिया', अशी झाली आहे. तिकडे भाजपसह सर्व पक्षांच्या आमदारांनी मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांना नाकारले आहे. राज्यपाल अनुसुईया उईके या भाजपच्या नेत्या होत्या. पंतप्रधान मोदी मणिपूरला न आल्याने लोक निराश आणि दुःखी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली होती; पण पंतप्रधान मोदी कोणाचेही ऐकायला तयार नाहीत. अनुसुईया उईके यांची लगेच उचलबांगडी करण्यात आली. ३१ जुलैपासून मणिपूरला कायमस्वरूपी पूर्णवेळ राज्यपाल नाही. आसामचे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांच्याकडे अतिरिक्त जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

मोदी नेहमी मनमोहन सिंग यांना मौनी म्हणायचे; पण आता मोदी स्वतःच मौनाचे सर्व विक्रम मोडत आहेत. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे, की नद्यांमध्ये मृतदेह तरंगत असल्याच्या बातम्या येत आहेत. सत्तर हजार लोक शिबिरात राहत आहेत. मणिपूर सरकारचे सुरक्षा सल्लागार कुलदीप सिंह यांनी माहिती दिली आहे, की १६ मे २०२३ पासून मणिपूरमध्ये मेईतेई आणि कुकी समुदायांमध्ये सुरू असलेल्या जातीय हिंसाचारात आतापर्यंत २५८लोकांना आपला जीव गमवावा लागला. मंत्री आणि आमदारांची घरे जाळल्या जात आहेत. हल्ले होत आहेत.

केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या (CAPF)१९८ कंपन्या राज्यात तैनात आहेत. आणखी ९० कंपन्या (सुमारे १०,००० सैनिक) पाठवल्या जातील. २०१७ पासून सत्तेत असलेले नोंगथोमबम बिरेन सिंग सरकार अल्पमतात आले आहे. १८ नोव्हेंबरला मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीला भाजपचे ३७पैकी १९आमदार आले नाहीत. मणिपूरमध्ये६० सदस्यीय विधानसभेत ५३आमदारांसह एनडीएची सत्ता होती. यापैकी एनपीएच्या ७ आमदारांनी १७ नोव्हेंबरलाच बिरेन सिंग सरकारला दिलेला पाठिंबा काढून घेतला.

आता मुख्यमंत्र्यांसोबत किती आमदार आहेत हे कोणालाच माहीत नाही. गेल्या सभेला केवळ २६ आमदार उपस्थित होते. जे बहुसंख्यांपेक्षा कमी आहेत. भाजपसह सारेच नेते मुख्यमंत्र्यांवर अकार्यक्षमतेचा आरोप करत आहेत; पण भाजप ना त्यांना हटवत आहे ना मोदी सरकार तिथे राष्ट्रपती राजवट लागू करीत आहे.

काश्मीर फाइल्स, केरळ स्टोरी, द साबरमती रिपोर्ट या चित्रपटांची पंतप्रधान प्रशंसा करतात; पण मणिपूरमध्ये काय घडत आहे याकडे डोळेझाक करतात. मोदीजी जरा मणिपूरचा खरा चित्रपट एकदा पहाच; काँग्रेसचे आवाहन आहे.

इंदिरा गांधींनी धगधगता पंजाब वाचवण्यासाठी, शांतता आणि बंधुता परत आणण्यासाठी बलिदान केले. ज्या पत्रकार, अधिकारी आणि नेत्यांनी चार दशकांपूर्वीचा पंजाब पाहिला आहे त्यांना विचारा की इंदिरा गांधींनी कसे मोठे निर्णय घेतले होते. टीकेचे घाव कसे सहन केले होते. आजही काँग्रेसवर प्रश्न उपस्थित केले जातात; पण पंजाब वाचला हे विसरून चालणार नाही.

काश्मीर धगधगत असताना २४ तास कर्फ्यू असायचा. १९९०मध्ये देशातील पत्रकार गेले होते. पत्रकार मित्र अक्षर यांनी एक अनुभव शेअर केला आहे. तेव्हा राज्यपाल सक्सेना पत्रकारांना बजावत असत, की एकतर आम्ही तुम्हाला सुरक्षा देऊ किंवा तुमच्या हालचालींवर निर्बंध घालू.

पत्रकार त्यांना म्हणायचे तुमच्या प्रशासनाने दिलेला 'कर्फ्यू पास' आमच्याकडे आहे. राज्यपाल संतापून म्हणाले होते की, हे पास पाहून दहशतवादी तुम्हाला सोडणार नाहीत. क्रॉस फायरिंगमध्ये ढाल म्हणून, हे पास चालणार नाही. अशी कठीण परिस्थिती होती. त्यात पाकिस्तानचा थेट हस्तक्षेप होता. आणि चीन, अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देशांनी पाकिस्तानच्या खांद्यावर हात ठेवला होता; मात्र १९९१ मध्ये केंद्रात काँग्रेसचे सरकार आल्यानंतर तेथील परिस्थिती सामान्य होण्याच्या प्रक्रियेला वेग आला.

लोकशाही प्रक्रिया पुन्हा सुरू करणे हे अत्यंत अवघड काम होते; पण ते झाले. आणि १९९६मध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या व पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर मिळाले. त्यानंतर सातत्याने निवडणुका वेळेवर कशा झाल्या याचा इतिहास आहे. १९९६ नंतर २००२ नंतर २००८ आणि नंतर २०१४ मध्ये मोदी आले. १० वर्षांनी पुन्हा २०२४ मध्ये निवडणुका घेण्यात आल्या. मणिपूरपूर्वी अशांत राज्यांमध्ये केंद्र सरकारे कशी काम करत होती, हे यातून स्पष्ट होत आहे.

ही सर्व सीमावर्ती राज्ये होती. आसाममध्ये राजीव गांधी यांनी शांतता करारावर स्वाक्षरी केली होती. आज आसाम तुलनेने शांत आहे. आणि तामिळनाडू! एलटीटीईची गंभीर समस्या श्रीलंकेपासून तामिळनाडूपर्यंत पसरली होती. पंजाबमध्ये इंदिरा गांधींना जसा मोठा निर्णय घ्यावा लागला, तसाच मोठा निर्णय इथेही राजीव गांधींना घ्यावा लागला. पंजाबमध्ये शांतता प्रस्थापित करण्याची किंमत त्यांच्या आई, भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांना चुकवावी लागली हे राजीव गांधींना माहीत होते. राजीव गांधींनी श्रीलंकेला एलटीटीईशी लढण्यासाठी मदत केली. इंदिरा गांधींसोबत घडलेल्या प्रकाराप्रमाणे इथेही लिट्टेच्या लोकांनी राजीव गांधींचा जीव घेतला. देशाला, काँग्रेसला आणि गांधी कुटुंबाला फार मोठी किंमत मोजावी लागली.

इतिहासात असे कुठे आहे का? येथे एवढेच सांगायचे आहे, की मणिपूरसारख्या समस्या यापूर्वीही निर्माण झाल्या होत्या; पण तत्कालीन पंतप्रधानांनी राजकारण बाजूला ठेवत देशाला सर्वोच्च प्राधान्य दिले. तीन देशांचा दौरा करून मोदी भारतात परतले आहेत. उद्या म्हणजे सोमवार २५ नोव्हेंबरपासून संसदेचे अधिवेशन सुरू होत आहे.

काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी पंतप्रधान मोदी यांच्याकडे मागणी केली आहे, की मोदी यांनीदेखील आता राजकारण बाजूला ठेवत मणिपूरला भेट द्यावी. मणिपूरच्या जनतेला सामान्य स्थिती, शांतता आणि सद्‌भाव हवा आहे.

भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांनी काँग्रेसवर केलेली टीका म्हणजे नकार, विकृती, विक्षेप आणि बदनामीचे प्रतीक आहे! पंतप्रधान मणिपूरला कधी भेट देणार? बहुमत गमावलेले मुख्यमंत्री वीरेंद्र सिंग किती दिवस खुर्चीला चिकटून राहणार? पूर्ण कालीन राज्यपालांची नियुक्ती कधी करणार? गृहमंत्री अमित शहा मणिपूरमध्ये शांतता कायम करण्यास असफल झाल्याची जबाबदारी स्वीकारणार की नाही? काँग्रेसने उपस्थित केलेल्या या प्रश्नांची उत्तरे मोदी सरकारकडून मिळण्याची अपेक्षा व्यर्थ आहे. तात्पर्य, 'मणिपूर: अजीब दास्तां है ये ...!'

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक असून मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य आणि ज्येष्ठ पत्रकार आहेत.)
यवतमाळ

## प्रासंगिक

# भारतीय तुरुंगव्यवस्था: कैद्यांची वाढती गर्दी आणि न्यायाची प्रतीक्षा



**विकास परसराम मेश्राम**
7875592800

एका लोकशाही देशाच्या न्यायव्यवस्थेत मानवतावादी दृष्टिकोन असणे अपेक्षित आहे. सरकारने विचाराधीन कैद्यांच्या सुटकेसाठी घेतलेला पुढाकार हा एक सकारात्मक पाऊल असून त्याची यशस्वी अंमलबजावणी होण्यासाठी सर्व संबंधित घटकांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. तरच खऱ्या अर्थाने न्याय व्यवस्थेत सुधारणा घडून येईल आणि प्रत्येक नागरिकाला न्याय मिळेल.

भारतीय तुरुंगांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी आहेत ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. या कैद्यांपैकी ७५ टक्के कैद्यांची आहेत ज्यांची सुनावणी सुरू आहे. अशा स्थितीत केंद्रीय गृहमंत्र्यांच्या या घोषणेने आशा निर्माण झाली असून त्यामध्ये २६ नोव्हेंबर या संविधान दिनापर्यंत जास्तीत जास्त एक तृतीयांश शिक्षा भोगलेल्या कैद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे. निःसंशयपणे, याचे स्वागत केले पाहिजे, परंतु न्याय सुनिश्चित करण्यासाठी आव्हाने खूप मोठी आहेत. भारतीय नागरी संरक्षण संहितेच्या कलम ४७९ सारख्या अलीकडील कायदेविषयक सुधारणा असूनही, प्रणालीगत विसंगती कायम आहेत. विचाराधीन अंडरट्रायल कैद्यांची सुटका जलद करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेने एका जटिल समस्येकडे लक्ष देण्याची गरज अधोरेखित केली आहे.

भारतीय तुरुंगव्यवस्थेतील सद्यस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या २०२२ च्या अहवालानुसार, देशातील तुरुंगांमध्ये एकूण ५,५४,०३४ कैदी असून, यापैकी ७७.२% म्हणजेच ४,२७,१६५ कैदी हे विचाराधीन आहेत. तुरुंगांची प्रमाणित क्षमता ४,२५,६०९ असताना त्यात १३०.२% भरती आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयानी केलेल्या महत्त्वपूर्ण घोषणेमुळे आशेचा किरण दिसू लागला आहे. २६ नोव्हेंबर या संविधान दिनापर्यंत एक तृतीयांश शिक्षा भोगलेल्या कैद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे.

राज्यनिहाय आकडेवारी पाहिली असता उत्तर प्रदेशात सर्वाधिक १,१७,७८९ कैदी असून तेथील भरती क्षमता १५८.९% आहे. बिहारमध्ये ७३,६०९ कैदी असून भरती क्षमता १७७.२%, मध्य प्रदेशात ४९,७६३ कैदी असून भरती क्षमता १५५.३% तर महाराष्ट्रात ४०,५५२ कैदी असून भरती क्षमता १४५.६% आहे. विचाराधीन कैद्यांपैकी ४१% कैदी एक वर्षापेक्षा कमी कालावधीपासून, २५% एक ते दोन वर्षे, १५% दोन ते तीन वर्षे, १२% तीन ते पाच वर्षे आणि ७% कैदी पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून तुरुंगात आहेत.

या घोषणेचे स्वागत करण्यासारखे असले तरी न्याय सुनिश्चित करण्यासमोरील आव्हाने मात्र गंभीर स्वरूपाची आहेत. भारतीय नागरी संरक्षण संहितेच्या कलम ४७९ सारख्या अलीकडील कायदेविषयक सुधारणा करण्यात आल्या असल्या तरी, प्रणालीगत विसंगती अद्याप कायम आहेत. सरकारी आकडेवारीनुसार, या नव्या उपक्रमामुळे सुमारे १,४५,००० कैद्यांना मदत होऊ शकते.

आर्थिक स्थितीनुसार विश्लेषण केल्यास ६९.८% कैदी गरीबी रेषेखालील, २५.२% मध्यम वर्गीय तर केवळ ५% उच्च वर्गीय आहेत. शैक्षणिक पार्श्वभूमी पाहता ३५.४% कैदी निरक्षर, २७.% प्राथमिक शिक्षित, २६.२% माध्यमिक शिक्षित तर केवळ १०.८% उच्च शिक्षित आहेत.

२०२२-२३ मध्ये प्रति कैदी दैनिक खर्च रु. २२५.३५ होता. वार्षिक एकूण खर्च रु. ६,९७८ कोटी असून त्यातील रु. ८४७ कोटी आरोग्य सेवांवर तर रु. १३२ कोटी शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षणावर खर्च करण्यात आले.

न्यायप्रक्रियेतील विलंबाची स्थिती पाहता सरासरी प्रकरण निकाली काढण्याचा कालावधी ३.७ वर्षे आहे. विचाराधीन कैद्यांची प्रकरणे हाताळणाऱ्या १८,००० न्यायाधीशांकडे प्रत्येकी २५०-३०० प्रकरणे प्रलंबित आहेत. जामीन मंजुरीचे प्रमाण पाहता पहिल्या सुनावणीत १२%, तीन महिन्यांत २८%, सहा महिन्यांत ३५%, एक वर्षात १५% तर एक वर्षापेक्षा जास्त कालावधीत १०% कैद्यांना जामीन मिळतो.

२०२४-२५ साठी सुधारणांसाठी एकूण रु. २,६७५ कोटींचा निधी प्रस्तावित करण्यात आला असून त्यात तुरुंग आधुनिकीकरणासाठी रु. १,८०० कोटी, ई-जेल प्रकल्पासाठी रु. ४५० कोटी, कायदेशीर सहाय्यासाठी रु. २५० कोटी आणि कर्मचारी प्रशिक्षणासाठी रु. १७५ कोटी यांचा समावेश आहे.

पायाभूत सुविधांची स्थिती चिंताजनक आहे. ७५% तुरुंगांमध्ये जागा अपुरी असून ६०% तुरुंगांमध्ये वैद्यकीय सुविधा अपुऱ्या आहेत. प्रति ३५ कैद्यांमागे एक स्वच्छतागृह असून प्रति कैदी ४० लिटर पाणी पुरवठा केला जातो, जो आवश्यक १३५ लिटर पेक्षा खूपच कमी आहे.

मानवी संसाधनांची स्थिती पाहता एकूण ८७,९३८ मंजूर पदांपैकी केवळ ६०,५२७ कर्मचारी कार्यरत असून ३१% पदे रिक्त आहेत. कैदी-कर्मचारी गुणोत्तर ९:१ असून ते आदर्श गुणोत्तर ६:१ पेक्षा जास्त आहे.

गृहमंत्री अमित शाह यांनी तंत्रज्ञानाच्या एकात्मता आणि सुधारणांबाबतचे आश्वासन दिले असले तरी, अंमलबजावणी जलद होणे आवश्यक आहे. निःसंशयपणे, प्रणालीगत अडथळे दूर करण्यासाठी न्यायव्यवस्था, कायदा अंमलबजावणी संस्था आणि नागरी समाजाच्या प्रतिनिधींनी एकत्र काम केले पाहिजे. आपल्यासाठी हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की न्याय देण्यास होणारा विलंब हा केवळ कैद्यांना न्याय नाकारणेच नाही तर घटनेने दिलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचेही उल्लंघन आहे. निःसंशयपणे, अंडरट्रायलची परिस्थिती सुधारणे हीदेखील मानवी प्रतिष्ठेच्या देशाच्या बांधिलकीची चाचणी आहे. अशा परिस्थितीत कारागृहातील सुमारे पाच लाख कैद्यांच्या आवाजाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तार्किक आणि ठोस कृती करण्याचीही हीच वेळ आहे. तरच अंडरट्रायल कैद्यांना मोकळ्या हवेत श्वास घेण्याची संधी मिळेल. ही वस्तुस्थिती कोणापासूनही लपून राहिलेली नाही की तुरुंगात जास्त गर्दी असलेले कैदी हे गरीब आणि वंचित घटकातील लोक आहेत. त्यांच्यामध्ये अशा गरीब लोकांची संख्या मोठी आहे ज्यांना जामीन घेण्यासाठीही कोणी नाही. धोरणकर्त्यांनी हे लक्षात ठेवावे की तुरुंगाचा उद्देश केवळ शिक्षा देणे नव्हे तर परिस्थितीनुसार गुन्ह्याच्या रस्त्यावर उतरलेल्या लोकांचे जीवन सुधारणे हा आहे. कठोर आणि व्यावसायिक गुन्हेगारांना बाजूला ठेवून, कारागृहाचा पहिला उद्देश हा आहे की, जे कैदी प्रतिकूल परिस्थितीत किंवा उत्कटतेने गुन्हे करतात त्यांची मानसिकता बदलून त्यांना जबाबदार नागरिक बनवणे. यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने असेही निर्देश दिले होते की, अंडरट्रायल कैद्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा अहवाल तयार करावा, जेणेकरून सुटकेच्या अटी शिथिल करता येतील. अशा परिस्थितीत गर्दीने भरलेले कारागृह सुरळीत चालवण्यासाठी, अंडरट्रायल कैद्यांना वेळेवर न्याय देण्याची गरज आहे. भारतासारख्या लोकशाही देशात न्यायव्यवस्थेला मानवी चेहरा असायला हवा. हा दृष्टिकोन केवळ पुरोगामी नाही तर न्याय्यही आहे. अशा स्थितीत गृहमंत्रालयाने न्याय मिळवून देण्याच्या पुढाकाराचे स्वागतच करायला हवे. एका लोकशाही देशाच्या न्यायव्यवस्थेत मानवतावादी दृष्टिकोन असणे अपेक्षित आहे. सरकारने विचाराधीन कैद्यांच्या सुटकेसाठी घेतलेला पुढाकार हा एक सकारात्मक पाऊल असून त्याची यशस्वी अंमलबजावणी होण्यासाठी सर्व संबंधित घटकांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. तरच खऱ्या अर्थाने न्याय व्यवस्थेत सुधारणा घडून येईल आणि प्रत्येक नागरिकाला न्याय मिळेल.

झरपडा,ता, अर्जुनी/मोर, जि.गोंदिया
vikasmeshram04@gmail.com

## कवडसा

# 'ओळखा पाहू...'



**प्रा.डॉ.मोहन खडसे**
9823289010

हा कसा, तो कसा हे प्रत्येकाला इतरांविषयी नक्कीच माहीत असतं. याला तशी काही हरकत नाही कारण इतरांना जाणून घेणे, इतरांविषयी जाणून घेणे, हा माणसाचा स्वभाव असण्याचीच शक्यता आहे. मात्र माणसाला हे माहीत व्हायला पाहिजे, की तो नेमका कसा आहे. कोणताही माणूस कसा आहे हे इतरांना चांगलं माहित असतं मात्र त्याला स्वतःला माहित असणं, फार आणि फार आवश्यक असं आहे.

प्रत्येक माणसाला वाचनाची आवड असते. कुणाला कमी तर कुणाला जास्त एवढाच काय तो फरक ! काय वाचावं आणि केव्हा वाचावं, कसं वाचावं आणि किती वाचावं हा ज्याच्या त्याच्या आवडीचा प्रश्न आहे अन् गरजेचासुद्धा !फार पूर्वी एक पुस्तक वाचण्यात आलं होतं - 'अपने आपको पहचानिये 'या पुस्तकाचं वैशिष्ट्य हेच होतं, की प्रत्येक माणसाला त्याची स्वतःची ओळख व्हावी यासाठी प्रयत्न करणे आणि जाणून घेण्याची आवश्यकता अधिक आहे, हे अधोरेखित केले गेले आहे, या पुस्तकात! पण असे पुस्तक सगळ्यांच्या वाचनात येईल असं नाही. मग काय करावं? तर जे वाचण्यात येतं, जे पाहण्यात येतं, जे जाणण्यात येतं, त्यातून माणसाला स्वतःला ओळखण्याची संधी मात्र मिळू शकते एवढं नक्की! ही संधी खरंतर प्रत्येकाला कमी अधिक प्रमाणात मिळत असते आणि तिचा उपयोग माणसाने नक्कीच केला पाहिजे अन्यथा त्याचे हाल त्यालाच भोगावे लागतात एवढं मात्र खरं.

हा कसा, तो कसा हे प्रत्येकाला इतरांविषयी नक्कीच माहीत असतं. याला तशी काही हरकत नाही कारण इतरांना जाणून घेणे, इतरांविषयी जाणून घेणे, हा माणसाचा स्वभाव असण्याचीच शक्यता आहे. मात्र माणसाला हे माहीत व्हायला पाहिजे, की तो नेमका कसा आहे. कोणताही माणूस कसा आहे हे इतरांना चांगलं माहित असतं मात्र त्याला स्वतःला माहित असणं, फार आणि फार आवश्यक असं आहे.

एकानं केलं तसंच दुसऱ्यानं करणं किंवा करुन पाहणं तसं चुकीचं नाही पण तसंच जमेल याची कुठं खात्री आहे ? जे जमत नाही, जे करता येत नाही, ते मान्य करण्यात किती मोठेपणा असतो, समाधान असतं आणि आनंदही असतो. एक प्रकारची शांतता लाभते. अर्थात हे समाधान लाभण्यासाठी मनाचा मोठेपणा आणि इतरांची गुणवत्ता मान्य करण्याची प्रवृत्ती आवश्यक आहे अन्यथा विनाकारण नुसता जळफळाट करणारी माणसं काय समाजात कमी आहेत? इतरांसारखं खूप परिणामकारक वाचनीय लिहिता येत नाही हे माहीत असूनही लिहिणाऱ्या एका माणसाच्या लेखनाला वाचून यशस्वी प्रशासन अधिकारी अंबादास मानकर यांनी प्रतिक्रिया दिली, 'तुमच्या लेखनातून तुमची प्रतिभा दिसून येते. यासारखे लिहिणे आम्हाला जमत नाही.' लेखकाने उत्तर दिलं- 'तुम्हाला प्रशासन करता येते, आम्हाला नाही. तुमच्या गुणवत्तेला सलाम!' दोघेही आनंदात होते कारण दोघांनी मान्य केलं की एकासारखं दुसऱ्याला करता येत नाही अन् पण ज्याला जे करता येतं ते त्याने उत्तम पद्धतीने करण्याचा प्रयत्न करावा!

माणसाने आपल्या आसपास पाहिलं की त्याला सगळंच काही करावसं वाटतं. हिरवेगार शेत पाहिलं की एखादं शेत घ्यावसं वाटतं, एखाद्या दुकानात खूप गर्दी दिसली की दुकान चालवावंसं वाटतं, कुणी खूप छान गाणं म्हटलं की तसंच गाणं म्हणावंसं वाटतं किंवा एखादं वाद्य वाजवावंसं वाटतं, खूप छान खेळत असलं की तसं खेळावंसं वाटतं, कुणी छानशी फॅशन केली की तसंच फॅशन म्हणा की कपडे म्हणा घालावेसे वाटतात, कुणी सार्वजनिक ठिकाणी एखादा पदार्थ मन लावून खात असलं की माणसाला खावसं वाटतं. हे असं वाटणं चुकीचं नाही मात्र माणसाला जे वाटतं ते प्रत्येकाला करता येईलच असं नाही किंवा त्याच्या करण्याच्या क्षमतेत आहे असं नाही. हे लक्षात न आल्यानेच बऱ्याचदा गफलत होते आणि माणूस इतरांसारखं करण्याच्या प्रयत्नात अयशस्वी होतो, ज्याचं दुःख फक्त त्याच माणसाला असतं जो 'तसं' करण्याचा प्रयत्न करतो. कोणताही विचार न करता!

माणूस काय करतो, काय करायला पाहिजे, त्याला काय करता येतं, हे त्याला समजतं मात्र तरी त्याचं मन काही ऐकत नाही. जे जे दिसतं तसं काही करण्याचा प्रयत्न तो नक्की करत असतो. अनेक गोष्टी करून पाहण्याचा प्रयत्न करणारी माणसं आहेतच की नाही? पण त्यांना नेमकं काही कळत नाही. त्यांच्या मनात विचार खूप येतात, जातात पण कुठे तरी स्थिरावत नाहीत. अशीच काहीशी भावना व्यक्त करताना सुप्रसिद्ध गजलकार अकबर इलाहाबादी म्हणतात-


**बस जान गया मै**
**तेरी पहचान यही है**
**तू दिल मे तो आता है**
**समझ में नही आता**

(प्रस्तुत लेखक हे प्रसिद्ध स्तंभ लेखक, शिक्षणतज्ज्ञ असून त्यांच्या 'सावित्री फाऊंडेशन, अकोला' च्या माध्यमातून सक्रिय सामाजिक, शैक्षणिक कार्य करतात)

मो.नं.: ९८२३२८९०१०
ईमेल: mvkhadse9@gmail.com

# ‘जिलबी’१७ जानेवारीला मनोरंजनासाठी सज्ज

*प्रसाद ओक, स्वप्नील जोशी, शिवानी सुर्वे पहिल्यांदाच एकत्र*




गरम गरम ‘जिलबी’ची गोड चव काही औरच असते. अशीच एक लज्जतदार ‘जिलबी’ आपल्या भेटीला येणार आहे, पण मराठी चित्रपटरूपाने. आनंद पंडित मोशन पिक्चर्स निर्मित ही खुमासदार ‘जिलबी’ १७ जानेवारीला आपल्या मनोरंजनासाठी सज्ज होणार आहे. अभिनेता प्रसाद ओक, स्वप्नील जोशी, शिवानी सुर्वे या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत. या तिघांच्या जोडीला पर्ण पेठे, गणेश यादव, प्रणव रावराणे, अश्विनी चावरे, प्रियांका भट्टाचार्य या कलाकारांनी आपल्या अभिनयाने मनोरंजनाच्या या ‘जिलबी’चा खुसखुशीतपणा वाढवला आहे. या चित्रपटाचे आकर्षक असे पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. पोस्टरमधील कलाकारांचे लूक लक्ष वेधून घेणारे आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन नितीन कांबळे यांचे आहे. मराठी प्रेक्षकांसाठी ‘जिलबी’ हा चित्रपट जबरदस्त मनोरंजनाची ट्रीट असेल असे निर्माते आनंद पंडित सांगतात. गोड आणि गूढ अशी ‘जिलबी’ प्रेक्षकांना नक्की आवडेल आणि तिच्या मनोरंजनाचा चविष्ट आस्वाद प्रेक्षकांच्या मनात घर करेल असा विश्वास दिग्दर्शक नितीन कांबळे व्यक्त करतात.

# ‘जिप्सी’साठी शशी चंद्रकांत खंदारेंना ‘इफ्फी’चे नामांकन


## सर्वोत्कृष्ट चित्रपटांच्या नामांकनात ‘जिप्सी’ एकमेव मराठी चित्रपट

गोव्यात होत असलेल्या यंदाच्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियामध्ये (इफ्फी) यंदापासून पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट हा पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी सात चित्रपट स्पर्धेत असून पुरस्काराच्या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय चित्रपटांना शशी चंद्रकांत खंदारे यांनी दिग्दर्शित केलेला 'जिप्सी' हा चित्रपटही टक्कर देणार आहे.

'इफ्फी' हा केंद्र सरकारचा अधिकृत चित्रपट महोत्सव आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही या महोत्सवाला विशेष प्रतिष्ठा आहे. यंदा या महोत्सवाचे ५५वे वर्षं आहे. या पार्श्वभूमीवर, यंदापासून महोत्सवात पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट हा पुरस्कार देण्यात येणार आहे. त्यासाठी नामांकने जाहीर करण्यात आली आहेत. त्यात पाच आंतरराष्ट्रीय आणि दोन भारतीय दिग्दर्शकांच्या चित्रपटांचा समावेश आहे. या विभागातील विजेत्याला मानाचा रौप्य मयूर, १० लाख रुपये रोख आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहे. भारतीय चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली सिंगापूरचे दिग्दर्शक आणि पटकथाकार अँथनी चेन, अमेरिकन-ब्रिटिश चित्रपट निर्मात्या एलिझाबेथ कार्लसन, स्पॅनिश निर्माते फ्रान बोर्गिया तसेच ऑस्ट्रेलियाचे संकलक जिल बिलकॉक या ख्यातनाम मान्यवरांचे परीक्षक मंडळ विजेत्यांची निवड करणार आहेत.




विशेष म्हणजे, या स्पर्धेसाठी नामांकन मिळालेला 'जिप्सी' हा एकमेव मराठी चित्रपट आहे. 'बोलपट निर्मिती' या निर्मिती संस्थेने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. या पूर्वी राज्य शासनाने प्रतिष्ठेच्या कान महोत्सवात पाठवलेल्या तीन मराठी चित्रपटांमध्येही 'जिप्सी' या चित्रपटाचाही समावेश होता. त्यामुळे कान महोत्सवा पाठोपाठ इफ्फीसारख्या मोठ्या महोत्सवाचा मान 'जिप्सी' चित्रपटाला मिळाला आहे.




# ‘गुलकंद’ चित्रपट १ मे रोजी होणार प्रदर्शित

एव्हरेस्ट एंटरटेनमेंट प्रस्तुत, वेलक्लाऊड प्रॉडक्शन्स निर्मित ‘गुलकंद’ हा मुरलेल्या प्रेमाचा गोडवा चाखवणारा चित्रपट नवीन वर्षात १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतीच या चित्रपटाची सोशल मीडियाद्वारे घोषणा करण्यात आली आहे. सचिन मोटे लिखित, सचिन गोस्वामी दिग्दर्शित या चित्रपटात फॅमिली एंटरटेनमेंट आणि कॉमेडीचे अनोखे कॉम्बिनेशन पाहायला मिळणार आहे. यात सई ताम्हणकर, समीर चौघुले, ईशा डे, प्रसाद ओक, वनिता खरात, मंदार मांडवकर, जुई भागवत, तेजस राऊत, शार्विल आगटे अशी तगडी स्टारकास्ट असणार आहेत. ‘गुलकंद’चे सचिन गोस्वामी, सचिन मोटे आणि संजय छाब्रिया निर्माते आहेत. चित्रपटाचे नाव, भन्नाट टीम यामुळे प्रेक्षकांच्या मनात या चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढली आहे.

चित्रपटाबद्दल दिग्दर्शक, निर्माते सचिन गोस्वामी म्हणतात, ‘या सगळ्यांसोबत मी आधी काम केले असल्याने आमच्यात एक बॉण्डिंग आहे आणि आमची हिच केमिस्ट्री यातही प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट एक फॅमिली एंटरटेनर असून प्रेक्षकांना या मुरलेल्या गुलकंदाची चव चाखायला नक्कीच आवडेल. ही एक अशी कथा आहे, ज्याची लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच मजा घेऊ शकतात. ही अतिशय हृदयस्पर्शी कहाणी आहे. निर्माते संजय छाब्रिया म्हणतात, चित्रपटाची कथा ऐकताक्षणी मला आवडली. मुळात ही एक मुरलेली टीम आहे. त्यामुळे त्यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव कमाल आहे. आजच्या धावपळीच्या जगात प्रेक्षकांना असे हलके-फुलके विषय पाहायला आवडतात. हा चित्रपट पाहून प्रेक्षक हसतमुखाने थिएटरबाहेर पडतील.




# ‘निर्मिती संवाद’ कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

## मराठी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञांचा भरघोस प्रतिसाद

‘कथा हा चित्रपटाचा आधारस्तंभ असतो. तो भक्कम हवा. फक्त पैसे आहेत, म्हणून निर्माते होऊ नका. चित्रपट माध्यमाचा आणि व्यवसायाचा अभ्यास करा.’ असा सल्ला ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते सचिन पिळगांवकर यांनी राज्यभरातील चित्रपट निर्मात्यांना दिला. 'मेघराज राजेभोसले फाऊंडेशन' आयोजित मराठी चित्रपट निर्मात्यांसाठीच्या 'निर्मिती संवाद' या एकदिवसीय कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

पुण्यातील सूर्यदत्त इन्स्टिट्यूटच्या संकुलात नुकत्याच पार पडलेल्या या कार्यशाळेत राज्याच्या विविध भागांतून आलेल्या ४०० हून अधिक चित्रपट निर्मात्यांचा यात सहभाग होता. चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रातील नामवंत निर्माते, दिग्दर्शक, लेखक, कॅमेरामन, संकलक, वितरक, थिएटर मालक, वाहिन्यांचे कार्यकारी अधिकारी, ओटीटी तज्ज्ञ अशा अनेक विषयतज्ज्ञांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. सचिन पिळगांवकर पुढे म्हणाले, ‘सिनेमा फ्लॉप होत नाही, तुमचे बजेट फ्लॉप झालेले असते. बजेटवर नियंत्रण ठेवायला शिकून घ्या. शासनानेही निर्मात्यांना आर्थिक साह्य देण्याबरोबर इतरही बाबींसाठी मदत करावी.’ तेजस्विनी पंडित म्हणाल्या, ‘निर्मात्यांनी समूहनिर्मितीचा प्रयोग करावा ग्लॅमर नाही, तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मराठी चित्रपट पुढारलेले नाहीत आणि लार्जर देन लाईफ असे मराठीत काही नसते, या सर्व आक्षेपांना उत्तरे देणे शक्य होईल.’



# ‘इमरजन्सी’ चित्रपट जानेवारीत प्रदर्शित




कंगना रनौतच्या 'इमरजन्सी' चित्रपटाची नवी रिलीज डेट जारी करण्यात आली आहे. हा चित्रपट १७ जानेवारीला रिलीज केला जाईल. सेन्सॉरकडून या चित्रपटाला मंजुरी देखील मिळाली आहे. ही कहाणी १९७० च्या दशकातील आहे. जेव्हा देशात आणीबाणी जाहीर केली होती. या चित्रपटात त्या इंदिरा गांधी यांची भूमिका साकारत आहेत. चित्रपटामध्ये अनुपम खेर, महिमा चौधरी, मिलिंद सोमन, श्रेयस तळपडे, विशाक नायर आणि दिवंगत सतीश कौशिकसह अनेक कलाकार आहेत. जी स्टुडियोज, मणिकर्णिका फिल्म्स आणि रेनू पिट्टीद्वारा निर्मित, इमरजन्सीमध्ये संचित बलहारा आणि जी. व्ही. प्रकाश कुमार यांचे संगीत आहे.

# इंडियाज इंटरनॅशनशल ग्रुव्ह फेस्टिव्हल' स्पर्धेत मराठमोळ्या ठाणेकरांनी मारली बाजी !



बॉलिवूडच्या लोकप्रिय नृत्यांगना आणि पदन्यास इंटरटेन्टमेंटच्या सर्वेसर्वा मेघा संपथ या 'इंडियाज इंटरनॅशनशल ग्रुव्ह फेस्टिव्हल' या नृत्य मंचाच्या माध्यमातून गेल्या सात वर्षांपासून आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सवाचे आयोजन करीत आहेत. नृत्याची ओढ आणि वैशिष्ट्यपूर्ण शैलीत नृत्य सादरीकरणात वाक्बगार असलेल्या भारतीय तसेच इतर देशातील स्पर्धकांना हक्काचे व्यासपीठ 'इंडियाज इंटरनॅशनशल ग्रुव्ह फेस्टिव्हल' द्वारे मिळत आहे. "इंडियाज इंटरनॅशनशल ग्रुव्ह फेस्टिव्हल" चा सातवा आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सव नुकताच मलेशियातील कौलालंपूर शहरात पार पडला. या नृत्यमहोत्सवात ठाण्याच्या श्रेयस देसाई आणि मैथिली पटवर्धन या मराठमोळ्या स्पर्धकांनी दुसरे स्थान पटकावत रजत पदाची कमाई केली. श्रेयस देसाई आणि मैथिली पटवर्धन जोडीमुळे महाराष्ट्राने 'इंडियाज इंटरनॅशनशल ग्रुव्ह फेस्टिव्हल" या मंचाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सवात दुसरे स्थान पटकावले आहे. नृत्य महोत्सवाचे 'परीक्षकपद लोकप्रिय नृत्यांगना आणि अभिनेत्री सुधा चंद्रन, नृत्यदिग्दर्शिका वृषाली चव्हाण आणि नृत्यदिग्दर्शक मनन सचदेवा यांनी भूषविले आहे. श्रेयस देसाई, मैथिली पटवर्धन यांना नृत्य दिग्दर्शिका तन्वी पालव यांचे मार्गदर्शन लाभले.

# एरोस्पेस तंत्रज्ञ व्हा !






करिअर
**सुरेश वांदिले**


नॅसकॉम (द नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर ॲण्ड सर्व्हिस कंपनीज) संस्थेच्या अंदाजानुसार पुढील काही वर्षांत एरोस्पेस तंत्रज्ञान क्षेत्रात अब्जावधींची उलाढाल होण्याची शक्यता आहे. भारताकडून या क्षेत्रातील निर्यातसुद्धा मोठ्या प्रमाणावर वाढू शकते. भारताने अंतराळ संशोधनाचा बहुआयामी कार्यक्रम राबवण्याचे ठरविले असून यामध्ये दळणवळणीय उपग्रहांचा विकास, प्रगत दूरसंदेश वहन, उपग्रहीय आधारित दिशादर्शन कार्यप्रणाली, मानवी अंतराळ संशोधन, प्रगत अंतराळ वाहतूक कार्यप्रणाली, अवकाशयानांसाठी नव्या तंत्रांचे अधिक प्रगत इंजिन आदींचा समावेश आहे. या सर्व उपक्रमांना कालबद्धरीत्या आणि प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज भासणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, एरोस्पेस, केमिकल, कॉम्प्युटर सायन्स, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी या विषयातील बी. टेक पदवी प्राप्त उमेदवारांना या क्षेत्रात करिअरची संधी मिळू शकते.

इलेक्ट्रॉनिक्स शाखेतील डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स, मायक्रोवेव्ह, ॲन्टेना/ रडार, व्हीएलएसआय ॲण्ड एम्बेडेड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टिम, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स या विषयातील स्पेशलायझेशनसह एमटेक, मेकॅनिकल शाखेतील स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग, थर्मल, एरोनॉटिक्स या विषयातील स्पेशलायझेशनसह एमटेक केलेल्या विद्यार्थ्यांना संधी मिळू शकते.

अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात कार्यरत होण्यासाठी विज्ञान आणि अभियांत्रिकी ज्ञानशाखेच्या उमदेवारांना संधी मिळू शकते. अभियांत्रिकीतील प्रत्येक ज्ञानशाखेचा संबंध अंतराळाशी येतो. मेकॅनिकल अभियंते हे अवकाश यानांचे डिझाइन, बांधणी आणि निर्मितीमध्ये सहभागी होऊ शकतात. केमिकल अभियंते हे अवकाश यानांच्या इंधन प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. संगणक शास्त्रातील अभियंते माहिती विश्लेषणात सहभागी होतात. तथापि एरोस्पेस अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान या विषयातील तज्ज्ञांना अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात प्राधान्याने संधी मिळू शकते.

**अभ्यासक्रम**

इंडियन इंस्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी ही संस्था भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ स्पेस अंतर्गत कार्यरत असणारी महत्वाची संस्था आहे. केरळ राज्यातील थिरुवनंतपूरमपासून २० किलोमीटर अंतरावर असलेल्या वालियामाला येथे स्थित या संस्थेत अंतराळशास्त्र आणि तंत्रज्ञानातील पदवी, पदव्युत्तर पदवी आणि संशोधनपर अभ्यासक्रम चालविले जातात.



या संस्थेत अंतराळ संशोधनाच्या संदर्भातील जागतिक दर्जाच्या संशोधनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या संस्थेला डिम्ड युनिव्हर्सिटीचा दर्जा देण्यात आला आहे. अमेरिकेतील युनिव्हर्सिटीज स्पेस रिसर्च असोसिएशन आणि कॅलिफोर्निया इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीसोबत विद्यार्थी आणि अध्यापकांच्या शैक्षणिक आदानप्रदानासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत काही विद्यार्थ्यांना त्यांचे प्रकल्प आणि इंटर्नशीप अमेरिकेत करण्याची संधी दिली जाते.

**संस्थेचे अभ्यासक्रम**

संस्थेत बी. टेक इन एरोस्पेस इंजिनीअरिंग या शाखेत ७० विद्यार्थ्यांना, बी. टेक इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग या शाखेत ७० विद्यार्थ्यांना आणि ड्यूएल डिग्री (बी. टेक ॲण्ड मास्टर ऑफ सायन्स / मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी) या शाखेत २२ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. (हा अभ्यासक्रम पाच वर्षे कालावधीचा दहा सत्रात विभाजित करण्यात आला आहे.) हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर बीटेक इन इंजिनीअरिंग फिजिक्स आणि मास्टर ऑफ सायन्स (ॲस्ट्रॉनॉमी ॲण्ड ॲस्ट्रोफिजिक्स किंवा अर्थ सिस्टिम सायन्स) /मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी (सॉलिड स्टेट फिजिक्स किंवा ऑप्टिकल इंजिनीअरिंग) ही पदवी प्रदान केली जाते. पदव्युत्तर पदवीचे विषय सहावे सत्र संपल्यावर विद्यार्थ्यांना दिले जातात. यासाठी विद्यार्थ्यांचा पसंतीक्रम आणि सहा सत्रापर्यंतच्या शैक्षणिक कामगिरीचा विचार केला जातो.

**निवड प्रक्रिया-**


या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी JEE-ADVANCED मधील गुण ग्राह्य धरले जातात. (JEE-ADVANCED ही परीक्षा JEE-MAIN परीक्षेत उत्तीर्ण पहिल्या अडीच लाख विद्यार्थ्यांना देता येते. JEE-MAIN ही परीक्षा इंडियन इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी प्राथमिक परीक्षा आहे.)

# ‘शाका लाका बूम बूम’ मधील संजू अडकला लग्नाच्या बेडीत



छोट्या पडद्यावरील लहान मुलांची आवडती मालिका म्हणून ‘शाका लाका बूम बूम’ पाहिली जायची. शाळेतून आल्यावर दप्तर टाकून लहान मुले सर्वात आधी टीव्ही सुरु करायचे आणि ही मालिका पाहायची. या मालिकेतील संजूकडे एक जादूची पेन्सिल होती. या मालिकेने जवळपास सर्वच वयोगटातील प्रेक्षकांची मने जिंकली होती. या मालिकेत मुख्य भूमिका साकारणारा संजू म्हणजेच किंशुक वैद्य हा विवाहबंधनात अडकला आहे. सर्वांच्या उपस्थितीत शुक्रवारी २२ नोव्हेंबरला त्यांनी सात फेरे घेतले. त्याच्या लग्नापूर्वीच्या विधींचे फोटो मीडियावर व्हायरल होत आहेत. किंशुक व दीक्षा नांगपाल यांचा विवाहसोहळा आज अलिबाग येथे पार पडणार आहे.

# ‘कांतारा : अध्याय १’ मध्ये पाहायला मिळणार कदंब काळातील कथा




अभिनेता-दिग्दर्शक रिषभ शेट्टीने कांतारा चॅप्टर १ चित्रपटाच्या रिलीज डेटची घोषणा केली आहे. रिषभ शेट्टीने कांतारा चॅप्टर १ चित्रपटाचे पोस्टर शेअर करत चित्रपट प्रदर्शित होण्याची तारीख जाहीर केली आहे. कांतारा : चॅप्टर १ हा चित्रपट २ ऑक्टोबर २०२५ रोजी जगभरात प्रदर्शित होणार आहे. ‘कांतारा’ चित्रपटामध्ये कर्नाटकातील प्रसिद्ध ‘भूत कोला’ उत्सवाची कथा दाखवण्यात आली होती, तर आता ‘कांतारा : अध्याय १’ मध्ये कदंब कालावधीचा शोध घेतला जाईल. कदंब काळ हा भारतीय इतिहासाचा सुवर्णकाळ मानला जातो, जो त्याच्या आकर्षक समृद्धी आणि ऐतिहासिक सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. आता चित्रपटाच्या दुसऱ्या भागामध्ये कदंब काळातील कथा पाहायला मिळणार आहे.

# ‘आय वॉन्ट टू टॉक’ चित्रपटाची भारतात २५ लाख रुपयांची कमाई

बॉलिवूड अभिनेता अभिषेक बच्चनच्या 'आय वॉन्ट टू टॉक' या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा रंगली आहे. अखेर २२ नोव्हेंबर रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला. आता पहिल्या दिवशी या चित्रपटाने किती कमाई केली असेल असा प्रश्न सर्वांना पडला असल्याने नुकताच या चित्रपटाचे बॉक्स ऑफिस कलेक्शन समोर आले आहे. अभिषेक बच्चनच्या 'आय वॉन्ट टू टॉक' सिनेमाने पहिल्या दिवशी भारतात फक्त २५ लाख रुपयांची कमाई केली. शुक्रवारी एकूण ७.४४ टक्के हिंदी ऑक्युपेन्सी होती. अभिषेक बच्चनची मुख्य भूमिका असलेल्या 'आय वॉन्ट टू टॉक' या चित्रपटाने त्याच्या शेवटच्या 'घूमर' (२०२३) चित्रपटापेक्षाही कमी कमाई केली आहे. जगभरात चित्रपटाने ८५ लाख रुपयांची कमाई केली आहे.



# ‘तू ही रे माझा मितवा’ मालिका २३ डिसेंबरपासून





प्रेम कुणाचे नाही कुणावर... प्रेम असे आभासच केवळ, प्रेम असावी एक कल्पना... प्रेम मनातील व्यर्थ भावना, सोडूनी अर्ध्यावर जाते कोणी कुणा... आठवांच्या उरती छळणाऱ्या खुणा, तरी ही चाहूल गोड कुणाची जीवाला ओढ लावी, का नाव कुणाचे घेता ही रात दरवळून यावी, या मनात रुजलेला कोणाचा गोडवा... तू ही रे माझा मितवा"
लेखिका रोहिणी निनावे यांनी लिहिलेले हे शीर्षकगीत अर्णव आणि ईश्वरीच्या प्रेमाची गोष्ट सांगून जाते. या दोघांची प्रेम कहाणी थोडी हटके आहे. एकमेकांच्या प्रेमात ते जितके बुडाले आहेत तितकेच ते एकमेकांचा तिरस्कारही करतात. थोडक्यात प्रेम करुन कात्रीत सापडलेल्या अर्णव आणि ईश्वरीची हटके लव्ह स्टोरी म्हणजे 'तू ही रे माझा मितवा' ही मालिका. कुन्या राजाची गं तू रानी मालिकेतून घराघरात पोहोचलेली गुंजा म्हणजेच अभिनेत्री शर्वरी जोग आणि अभिनेता अभिजीत आमकर या मालिकेत मुख्य भूमिकेत दिसतील. ही नवी मालिका २३ डिसेंबरपासून रात्री १०.३० वाजता स्टार प्रवाहवर पाहता येणार आहे.

# लवकरच ‘दहावी अ’ करणार प्रेक्षकांचे मनोरंजन

ग्रामीण भागातील शालेय जीवनाचा अनुभव ग्लोबल केला 'आठवी अ’ या वेबसीरिजने. डोंगरावरच्या एका छोट्याशा खेडेगावातून हायस्कूलसाठी परगावी येणाऱ्या अभ्या व त्यांच्या खास मित्रांची साधी तरी प्रत्येकाला आपलीशी वाटणारी गोष्ट या सीरिजद्वारे दाखवण्यात आली होती. ग्रामीण भागातील शालेय जीवनात घडणारे हलके-फुलके तरीही मैत्रीची व्याख्या अधोरेखित करणारे महत्त्वपूर्ण प्रसंग 'आठवी अ'ने दाखवले होते. 'इट्स मज्जा'च्या 'आठवी अ’ या वेबसीरिजला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. 'आठवी अ’ संपल्यावर पुढे काय याची उत्सुकता प्रेक्षकांना लागून राहिली होती.



'आठवी अ’नंतर प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास सज्ज होणार आहे ‘दहावी अ’ ही वेबसीरिज. काही दिवसांपूर्वी ‘दहावी-अ’चा मुहूर्त सोहळा संपन्न होऊन शूटिंगला सुरुवात झाली. हल्लीच ‘दहावी अ’च्या टीमने मुहूर्ताचे खास क्षण सोशल मीडियावर शेअर केले. सोशल मीडियाद्वारे अनेक प्रेक्षकांनी ‘इट्स मज्जा’च्या आगामी ‘दहावी-अ’साठी उत्सुकता व्यक्त केली आहे. आयुष्यात केव्हाही अभिनय ना केलेल्या ग्रामीण भागातील मुलांनी 'आठवी अ’ या वेबसीरिजला एका रंजक वळणावर आणून ठेवले होते. त्यामुळे ‘दहावी अ' या वेबसीरिजविषयी प्रेक्षकांना उत्सुकता लागून राहिली आहे. 'दहावी अ'मधून प्रेक्षकांना काय नवीन पाहायला मिळणार? या सीरिजमधून आता आणखी कोणती नवीन कथा दिसणार? ही नवीन सीरिज कधी प्रदर्शित होणार? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे प्रेक्षकांना लवकरच मिळणार आहेत.

# लोकशाही उत्सवात बोगसगिरीचा विस्तव!

## राजेभाऊ फड यांनी उपस्थित केले अनेक प्रश्न!

## परळीतील निवडणूक प्रक्रियेवर गंभीर आरोप

## लोकशाहीवर हिटलरशाहीची छाया?



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

२३३ परळी विधानसभा निवडणुकीत अनेक गैरप्रकार घडून आले. अपेक्षा सुद्धा केली नसेल एवढे बोगस प्रकार घडले. बोगस मतदान आणि बूथ यंत्रणा ताब्यात घेण्याचे प्रकार घडू नयेत यासाठी न्यायालयात दाद मागून सुद्धा प्रशासनाने कुठलीही खबरदारी न घेतल्याने ३१३ बुथवर बोगस मतदान करण्यात आले. सरळसरळ ही लोकशाहीची हत्या असून हिटलरशहीचा उदय झाल्याचे हे संकेत आहेत अशी प्रतिक्रिया युवक नेते राजेभाऊ फड यांनी माध्यमांना दिली आहे.

परळी मतदारसंघातील निवडणुकीवर गंभीर आरोप झाले असून, स्थानिक नेते राजेभाऊ फड यांनी निवडणूक प्रक्रियेत हिटलरशाहीचे दर्शन घडल्याचा आरोप केला आहे. त्यांनी निवडणुकीदरम्यान पैशांचा सर्रास वापर, दहशतीचे वातावरण, मतदान केंद्रांवर ताबा मिळवून बोगस मतदान करणे, मयत मतदारांचे मतदान आणि महिलांना मतदानापासून रोखणे यांसारख्या प्रकारांवर रोष व्यक्त केला आहे.

लोकशाहीच्या नावाखाली हिटलरशाहीचे प्रयोग सुरू आहेत. मतदारांचा आवाज दडपण्याचा हा प्रकार गंभीर असून यामुळे लोकशाही मूल्यांची गळचेपी होत आहे, असे राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. या आरोपांमुळे परळीतील राजकीय वातावरण तापले असून, निवडणूक आयोगाकडून या आरोपांची तातडीने चौकशी केली जाईल अशी मागणी होत आहे. जनतेनेही या प्रकरणाचा गांभीर्याने विचार करून लोकशाही टिकवण्याच्या दिशेने पाऊल उचलण्याची गरज असल्याचे राजेभाऊ फड यांनी आवाहन केले आहे. राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर सत्य परिस्थिती काय आहे, हे निवडणूक आयोगाच्या चौकशीनंतर स्पष्ट होईल. मात्र, हे आरोप परळीच्या राजकारणाला नवे वळण देणार, यात शंका नसल्याचेही ते म्हणाले.

# केजमध्ये मनरेगाच्या शेकडो विहीरी बोगस

**चर्चा:** भोंगळ कारभार कधी बंद होणार?




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पंचायत समिती मध्ये महात्मा गांधी राष्टीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगा या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना सिंचन विहिरींचा लाभ दीला आहे परंतु केज तालुक्यातील अनेक वीहीरी भोगस झालेल्या आहेत . त्या विहीरी फक्त कागदावरच आहेत याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. कारण ज्यांना विहीरीची गरज आहे अशा व्यक्तिंना , शेतकऱ्यांना विहीर मनरेगा योजनेचा लाभ मिळाला नाही मग केज तालुक्यात शेकडो विहीरी वाटल्या मग त्या गेल्या कुठे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच काही भोगस विहीरीची रक्कम काढण्यासाठी एका विहीरीला हजारो रुपये घेतले जात आहेत असे समजले जाते आहे तरी एका विहीरीला चार लाख रुपये

पान २ वर...

# माजलगावात साजरी झाली उत्साहात दिवाळी

**आनंदोत्सव:** प्रकाश सोळंकेंच्या विजयामुळे आनंद



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील मतदारसंघात प्रकाश दादा सोळंके यांनी विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत महायुतीच्या वतीने प्रचंड विजय मिळवला असून, या विजयामुळे माजलगाव शहरात ठीक ठिकाणी विजयी उत्सव साजरा करण्यात आला. घराघरांमध्ये दिवे लावून, फटाके फोडून आणि मिठाई वाटून मतदार संघातील लोकांनी विजयी दिवाळी साजरी केली. माजलगाव मतदार संघाचे नवनिर्वाचित मा.आ.प्रकाश दादा सोळंके यांनी ५८९९ मतांच्या मताधिक्याने पाचव्यांदा विजय मिळवत आपल्या सर्वांगीण विकासाच्या बळावर लोकप्रियतेचा ठसा उमटवला आहे.

मतदारसंघातील नागरिकांनी या निवडणुकीत विकासाला प्राधान्य देत मा.आ.प्रकाश दादा सोळंके यांना मोठ्या मतांनी विजय मिळवून दिला. मतदारांनी सोळंके यांच्या कार्यक्षम नेतृत्वावर आणि विकास कामांवर विश्वास दाखवत त्यांना पाचव्यांदा विधानसभेच्या सभागृहात पाठवले आहे.प्रकाश दादा सोळंके यांच्यासमोर महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप, अपक्ष उमेदवार रमेश आडसकर, माधव निर्मळ आणि बाबरी मुंडे अशी चुरशीची लढत होती. या निवडणुकीत सोळंके यांनी सुरुवातीला पोस्टल मतदानामध्ये आघाडी घेतली परंतु पुढे काही फेऱ्या मध्ये पिछाडी वरती अलेले सोळंके २० व्या फेरीत पुन्हा आघाडी घेतली आणी पुन्हा प्रत्येक फेरीत आघाडी घेत विजयाचा महायुतीचा झेंडा रोवला.निवडणुकीच्या निकालानंतर माजलगाव शहरात आणि परिसरात उत्साहाचे वातावरण पसरले होते. विजयानंतर भव्य दिव्य असे विजयी रॅली चे आयोजन करण्यात आले या वेळी मा.आ.प्रकाश दादा सोळंके यांनी सर्व कार्यकर्त्यांचे आणि मतदारांचे मनापासून आभार मानले आणि हा विजयाच्या पाठीमागे लोकांचा विश्वास व आशीर्वाद असल्याचे सांगितले. त्यांनी मतदारसंघातील सर्व नागरिकांचे विशेष आभार मानत, लोकांनी विकासाला मत दिले आहे, आता हा विश्वास सार्थ करण्यासाठी मी अधिक मेहनत घेईन, असे आश्वासन दिले.

# इतर कारखान्यापेक्षा अधिकचा भाव

**मोहन जगताप:** छत्रपती कारखान्याचा गळीत हंगाम



माजलगांव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगांव तालुक्यातील छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा २०२४-२५ चा अकरावा गळीत हंगामाचा शुभारंभ रविवारी कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप व व्हा.चेअरमन मोहन जगताप तसेच शेतकऱ्यांच्या शुभहस्ते पार पडला. तसेच छत्रपती साखर कारखाना इतर कारखान्यापेक्षा अधिकचा ऊसाला भाव देणारा आहे तसेच मागील वर्षी पाऊस कमी प्रमानात असल्याने ऊसाची लागण कमी आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला ऊस छत्रपती सहकारी साखर कारखान्याकडे गळापासाठी आणावा असे प्रतिपादन कारखान्याचे चेअरमन मा.आ.बाजीराव (भाऊ ) जगताप यांनी केले.

तसेच कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहन जगताप शेतकऱ्यांना बोलताना म्हणाले की, मागील दहा हंगामात कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन १२५० मे.टन होती. या हंगामात कारखान्याची क्षमता वाढली असून आता ५००० मे.टन प्रतिदिन झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या ऊसाची कोंडी दूर झाली आहे. तसेच गेल्या दहा हंगामात छत्रपती

पान २ वर...



**परळी:** येथील मतदारसंघातून १ लाख ४० हजार इतक्या प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी पक्षाचे अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे,छगन भुजबळ यांची मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी भेट घेऊन अभिनंदन केले तसेच आभार व्यक्त केले. यावेळी त्यांच्या समवेत डॉ.योगेश क्षीरसागर होते.

# रानमळ्यात उभारला वनराई बंधारा

**उपक्रम:** लोकसहभागातून शिवार झाले जलमय



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुका कृषी अधिकारी कार्यालय, गेवराई अंतर्गत मंडळ कृषी अधिकारी व रानमळा येथील ग्रामस्थांच्या लोकसहभागातून वनराई बंधारा उभारण्यात आला आहे. यामुळे परिसरातील विहीर, बोअरवेलच्या पाणी पातळीत वाढ होणार असून शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी यांचा उपयोग होणार आहे.

तालुका कृषी अधिकारी कार्यालय गेवराई अंतर्गत मंडळ कृषी अधिकारी गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली रानमळा येथील ग्रामस्थांच्या लोकसहभागातून वनराई बंधारा बांधण्यात आला. या वनराई बंधाऱ्यामुळे पाण्याचा प्रवाह आडवला जातो. यामुळे पाणी जमिनीमध्ये मुरल्यामुळे

पान २ वर...

उन्हाळ्याची चाहूल लागताच पाण्याचे स्त्रोत तळ गाठतात. त्यामुळे वनराई बंधारे शेतकर्यांसह पशु-पक्ष्यांसाठी वरदान ठरत आहेत. नदी - नाला येथे वाहत्या पाण्याच्या ठिकाणी सिमेंटच्या गोणींमध्ये माती भरुन बंधार्यांची निर्मिती केली तर पाण्याच्या पातळीत वाढ होऊन यातून पुढील अनेक दिवस गुराढोरांची तहान भागविली जाते. शेतकर्यांना शेती करणे देखील सोयीचे होऊन त्यातून चांगली पीके घेता येतात. त्यामुळे शेतकरी बांधवांनी जिथे शक्य आहे तिथे वनराई बंधारे उभारावेत यासाठी कृषी विभागाकडून मार्गदर्शन केले जाते.

- लहू चव्हाण, कृषी पर्यवेक्षक गेवराई

# ओंकारेश्र्वर देवाचा अभिषेक सोहळा

**अध्यात्मिक:** पवारवाडीत भाविक-भक्त तल्लीन



गंगामसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील देवकृपा नगर पवारवाडी येथील गोशाळेत त्रिधारा येथील श्री ओंकारेश्र्वर देवाचा महारूद्र अभिषेक सोहळा व देवाच्या नवमीच्या कार्यक्रम दि.२४ रविवार रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. देवाच्या महारूद्र अभिषेक सोहळ्याला सकाळी ११ वाजता चैतन्यदायी वातावरणात प्रारंभ झाला. श्रींचा महारूद्र अभिषेक सोहळ्यात ५१ यजमानांनी सहभाग नोंदवून आपला संकल्प पुर्ण केला. त्रिधारा व माजलगाव येथील पुरोहितांच्या वेद मंत्रघोषात हा अभिषेक सोहळा संपन्न झाला. परिसरातील शेकडो महिला व पुरुष भाविक भक्तांनी देवाच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. महारूद्र अभिषेक सोहळा

पान २ वर...

# जनतेच्या सेवेत सतत कार्यरत राहील

**डॉ.योगेश क्षीरसागर:** मतदारांसह पदाधिकारी,कार्यकर्त्यांचे मानले आभार



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांचा निसटता पराभव झाला. या पार्श्वभूमीवर त्यांनी जनतेचा कौल मला मान्य आहे. यापुढेही जनतेच्या सेवेत कार्यरत राहील, असे म्हणत बीडच्या माय-बाप जनेतेचे आभार मानले आहेत.

डॉ.योगेश क्षीरसागर यांना बीड विधानसभा मतदारसंघातून पहिल्याच प्रयत्नात ९६ हजार ५५० मते मिळाली. परंतु ५ हजार ३२४ मतांनी पराभव झाला झाला. या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जनतेचा कौल मान्य असल्याची प्रतिक्रिया दिली. बीड विधानसभा मतदारसंघातील सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहिलो. यापुढेही सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी मी कार्यरत राहीन. माझ्यासाठी राबलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजप, शिवसेना, रिपाइंसह मित्र पक्षाच्या सर्व

पान २ वर...

**चित्र** मताधिक्क न देणारे पुढारी चिंतेत,पैसे घेऊन मतदान न करणारे पुढारी वाढले

# विजयी,पराभुत उमेदवार लागले हिशोबाला!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभेची निवडणुक अत्यंत चुरशीची झाली मतदान मोजणी आज पर्यत अशी होईल हे कधीही कुनाला वाटले नव्हते मताधिक्क हे १० हजार पर्यत कुनाचेही गेले नाही पन निवडणुक ही स्वता:ला आत्मपरिक्षण लावणारी होती कुनावर किती विश्वास टाकुन काम करायचे हे मतदारानी दाखवुन दिले पहीले राजकारण करताना गावात सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचे नेते आपल्या मर्जीतले एक दोन कार्यकर्ते आसायचे पन ती परिस्थिती राहिलेली नाही आज नेतेमंडळीने सांभाळलेल्या कार्यकर्ते स्व:ताच्या सोयीनुसार नेत्याचे कान भरलेले दिसतात त्यांचा प्रत्यय हा निवडणुकीत दिसुन येतो अन तेव्हा नेत्याला वाटते की आपन या गावासाठी काय कमी केले नाही मग मतासाठी दारोदार का जावे लागते पन गावात वेगळीच परिस्थिती आसते जो नेतेवर भरोसा ठेऊन आसतो तो कधिही गुत्तेदार नसतो उमेदवारी मागत नसतो तो कधी मतदानावेळी पैसे मागत नसतो पन हे कानफुके मंडळीमुळे निवडणुकीमधे नेतेना त्रास सहन करावा लागतो हा काळ संपला आहे आता नेते मंडळीनी आपले कानफुके कार्यकर्ते ही व्याख्या संपवली पाहीजे आता आपले गाव नागरीक माझे या व्याख्याने कारभार केला पाहीजे आज पर्यत पैसे घेतले की आपले काम करतो ही भुमिका संपली पाहीजे पैसे न घेताही स्वाभिमानाने पन काही जन उमेदवाराचे काम करत आसतात तेच विजयाची सलामी देत आसतात आज जे गावात दोन चार पुढारी दुकान टाकुन बसलेले आसतात ते बोबाटा करणारे दोन चार व्यक्तीला पैसे देऊन आपन किती

पान २ वर...

# काळेगावात वाळु माफीयांचा हौदोस!

**सवाल:** तहसीलदार, वाळुमाफीयांचे कमीशन का?



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील काळेगाव नदी परिसरामध्ये मध्ये वाळू माफियांचा धुमाकूळ सुरु आहे. उत्रेश्वर पींप्री व बोरगाव या परिसरामध्ये नदीपात्रात मध्ये रोज रात्रीच्या वेळी वाळू माफिया हजारो ब्रश वाळू उपसा करतात. नदीपात्रातून वाळू माफिया वाळूची ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळूची हजारो ब्रास वाळू उपसा चोरी करत आहे उत्रेश्वर पींप्री व बोरगाव नदीपात्रामध्ये एक ते दीड - खोलीचे खड्डे पडले आहे. त्यामुळे शेतकरी हवाल दिल झाला आहे. त्यामधून वाळू माफियाना हजारो ब्रास वाळूची चोरलेला दिसून येत आहे. दुसरीकडे वाळू माफिया यांचे अच्छे दिन आलेले दिसत आहे. त्यामुळे महसूल व पोलीस प्रशासन यांचे दुर्लक्ष दिसून येत आहे. उत्रेश्वर पींप्री व बोरगाव नदी पात्रामध्ये अवैध रीतीने ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळू उपसा कधी थांबणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे. तर

पान २ वर...